
रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक ३४
www.ramprahar.com

रविवार, २० ऑगस्ट २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## मुंबईत ३१ ऑगस्टला प्रो दहीहंडी स्पर्धा रंगणार



**मुंबई** : यंदाच्या वर्षीपासून महाराष्ट्रात प्रो दहीहंडी स्पर्धा सुरू होणार असल्याची घोषणा महाराष्ट्र सरकारने केली होती. आता या स्पर्धेची तारीख जाहीर झाली आहे. ३१ ऑगस्टला मुंबईत प्रो दहीहंडी स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेसाठी पहिले बक्षीस ११ लाखांचे आहे, अशी माहिती मंत्री उदय सामंत यांनी दिली. दहीहंडीला साहसी खेळाचा, तर गोविंदांना खेळाडूंचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. याशिवाय प्रो दहीहंडी स्पर्धेची नियमावली ठरवण्यासाठी विधानभवनात बैठक झाली होती. त्या वेळी प्रो कबड्डी लीगच्या धर्तीवर प्रो दहीहंडी स्पर्धा सुरू करण्याचे ठरले. त्यानुसार मुंबईतील वरळी येथे ३१ ऑगस्ट रोजी प्रो गोविंदा अर्थात प्रो दहीहंडी ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

**अंतरंग**

उरण मोरा येथील साई मंदिरात चोरी/२

कर्जतमध्ये चोरांच्या बंदोबस्तासाठी ग्रामसभा/५

बेंचप्रेस स्पर्धेत अक्षय स्ट्राँग मॅन, अमृता स्ट्राँग वूमन/८

# १ ऑक्टोबरला मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक बांधिलकी म्हणून श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि रायगड जिल्हा मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने १५व्या मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिराचे आयोजन १ ऑक्टोबर रोजी पनवेलमधील खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात करण्यात आले आहे. या महाशिबिरात प्रत्येक शिबिरार्थीला सेवा देण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शनिवारी (दि. १९) येथे दिली.

- **पनवेलच्या खांदा कॉलनी येथील सीकेटी कॉलेजमध्ये उपक्रम**
- **प्रत्येक शिबिरार्थीला सेवा देण्यासाठी कटिबद्ध –अरुणशेठ भगत**

दरवर्षीप्रमाणे यंदाही मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर आयोजित करण्यात आले आहे. या संदर्भातील पहिली नियोजन बैठक मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली.




या बैठकीस भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी उपनगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, हरेश केणी, डॉ. अरुणकुमार भगत, अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, प्रवीण पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, संगीता कांडपाळ, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, **(पान २ वर..)**

> **महाशिबिरात येणाऱ्या प्रत्येक शिबिरार्थीच्या आरोग्याची काळजी घेण्यात येणार आहे. आरोग्यविषयक विविध तपासण्या, तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला तसेच औषधोपचार मोफत करण्यात येणार आहेत. आरोग्यसंदर्भात जनजागृती होणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने महाशिबिराचे नियोजन असणार आहे.**
> **–परेश ठाकूर**, सचिव, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ

> **गेली १४ वर्षे आरोग्य महाशिबिर मोठ्या प्रमाणात आणि यशस्वीपणे झाले आहे. यंदाचे महाशिबिर यशस्वी करण्याकरिता ३० विविध समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. त्यानुसार तयारीला सुरुवात झाली असून प्रत्येक समितीचा आढावा घेतला जाणार आहे.**
> **–जयंत पगडे**, अध्यक्ष, पनवेल शहर भाजप

# रतन टाटांना उद्योगरत्न पुरस्कार प्रदान

**उद्योग क्षेत्रातील महाराष्ट्र शासनाचा पहिला सन्मान; मान्यवरांची उपस्थिती**

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्योग क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचा पहिला उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक, पद्मविभूषण रतन टाटा यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शनिवारी (दि. १९) प्रदान करण्यात आला. टाटा म्हणजे विश्वास अशी जगभर ख्याती असलेल्या उद्योग समूहाचे रतन टाटा यांना हा पुरस्कार देण्याने पुरस्काराचा सन्मान वाढला आहे, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी पुरस्कार प्रदान केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.



उद्योगपती रतन टाटा यांना त्यांच्या कुलाबा येथील निवासस्थानी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मान्यवरांनी २५ लाख रुपयांचा धनादेश, सन्मानचिन्ह व मानपत्र या स्वरुपात पुरस्कार प्रदान केला. या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री उदय सामंत, शालेय शिक्षणमंत्री तथा मुंबई शहर जिल्ह्याचे पालकमंत्री दीपक केसरकर, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव भूषण गगराणी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, टाटा सन्सचे चेअरमन तथा महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. विपीन शर्मा आदी उपस्थित होते.

पुरस्कार प्रदान केल्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, मीठापासून ते वाहने, विमानांपर्यंत टाटा समुहाच्या उद्योगातून निर्मिती होते. टाटा समुहाने देशासह, जगभरात उद्योग क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. टाटा म्हणजेच विश्वास हे नाते आहे. राज्य शासनातर्फे उद्योग क्षेत्रातील योग्य व्यक्तीला पहिला पुरस्कार देण्यात येत असल्याचा आनंद आहे. या पुरस्काराने पुरस्काराचा मानसन्मान, उंची वाढला आहे.

तत्पूर्वी टाटा यांच्या निवासस्थानी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित मान्यवरांनी त्यांच्यासमवेत चंद्रशेखरन आदींशी उद्योग आणि राज्यातील विकास प्रकल्पांविषयी चर्चा केली. **(पान २ वर..)**

# रोह्यात लॉजवर सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर पोलिसांची धाड

**मॅनेजरला अटक, तीन महिलांची सुटका**

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

रोहा पोलिसांनी वेश्या व्यवसाय सुरू असलेल्या दमखाडी येथील श्रीराम लॉजवर शुक्रवारी रात्री उशिरा धाड टाकली. या प्रकरणी लॉज चालविणाऱ्या मॅनेजरला अटक, तर तीन महिलांची सुटका करण्यात आली आहे.

रोह्यात सुरू असलेल्या अनैतिक धंद्यांविरोधात गेले काही दिवस नागरिकांतून ओरड सुरू आहे. या विषयावर सामाजिक संघटना व राजकीय पक्षांची एकत्रित बैठकही झाली होती. त्यामध्ये नागरिकांना मोठ्या संख्येने उपस्थिती लावून अवैध धंद्यांविरोधात नाराजी व्यक्त केली होती तसेच गुरुवारी रोह्यातील शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे या विषयात लक्ष घालण्याची मागणी केली. याची दखल घेत पोलिसांचे शुक्रवारी रोह्यात धाडसत्र सुरू होते. रात्री उशिरा शहरातील दमखाडी येथील श्रीराम लॉजवर कारवाई करण्यात आली. या लॉजवर देहव्यापार सुरू होता. पोलिसांनी सापळा रचून मॅनेजर संजय वाघमारे याला अटक केली. त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तर तीन महिलांची सुटका केली. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करीत आहेत.

> रोहा पोलीस ठाण्याच्या हद्दीत श्रीराम लॉजवर वेश्या व्यवसाय चालत असल्याची माहिती मिळाली होती. आम्ही त्या ठिकाणी पाळत ठेवून छापा टाकला असता लॉजचा मॅनेजर, तीन महिला व दोन ग्राहक मिळून आले. या प्रकरणी मॅनेजरला अटक केली असून महिलांची सुटका करण्यात आली आहे. याबाबत अधिक तपास सुरू आहे.
> **–प्रमोद बाबर,** रोहा पोलीस निरीक्षक

## निवडक

### पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भाषिणी टूलची घोषणा

**नवी दिल्ली** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी (दि. १९) जी २० डिजिटल इकोनॉमी मंत्र्यांच्या बैठकीला संबोधित करताना एआय आधारित भाषिणी टुलची घोषणा केली. भाषिणी हे भारताने विकसित केलेले अनुवाद करणारे प्लॅटफॉर्म असून विविध भारतीय भाषांमधील अडथळे दूर करण्याचे काम करणार आहे.

### आयसीसीकडून वर्ल्डकपच्या शुभंकरचे शानदार अनावरण

**गुरूग्राम :** आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) शनिवारी (दि. १९) गुरूग्राम येथील कार्यक्रमात भारतात होणाऱ्या वनडे वर्ल्डकपच्या शुभंकरचे अनावरण केले. या वेळी युवा वर्ल्डकप विजेत्या भारतीय संघांचे कर्णधार शफाली वर्मा आणि यश धूल हेही उपस्थित होते. आयसीसीनुसार नाव न ठेवलेला पुरुष व महिला शुभंकर स्त्री–पुरुष समानतेचे प्रतिक आहे.



# पोलीस असल्याचे सांगून तरुणीवर लैंगिक अत्याचार

**पेणमधील घटना; आरोपी अटकेत**

**पेण : प्रतिनिधी**

पोलीस असल्याचे सांगून पेणमध्ये एका नराधमाने तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, १७ वर्षीय फिर्यादी तरुणी ही सहकाऱ्यासोबत ट्री हाऊसकडून पेणकडे येत असताना रिक्षाचालक प्रशांत पाटील याने मी पोलीस आहे असे सांगून तरुणी व साक्षीदार यांना जबरदस्तीने आपल्या रिक्षात बसवले आणि त्यांचे मोबाईल काढून घेत त्यांना धामणी येथील बंद पडलेल्या कंपनीत नेऊन रिक्षा थांबविली. या वेळी रिक्षाचालक प्रशांतने त्यांना खाली उतरवून व दमदाटी करून तरुणीला बळजबरीने प्रेग्नन्सी टेस्ट करायला सांगितली. त्यास नकार दिला असता प्रशांतने तरुणीचे कपडे काढून प्रेग्नन्सी टेस्ट करण्याची पट्टी तसेच बोट तिच्या गुप्तांगात घातले. नंतर आरोपीने मोबाईलवरील अश्लील व्हिडीओ दाखवून पीडित तरुणी व साक्षीदाराला तसे करण्यास सांगितले.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात भा.दं. वि. कलम ३७६, ३६३, १७०, ५०५ बालकाचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२चे कलम ४,८,१२ प्रमाणे तसेच अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा १९८९नुसार गुन्हा दाखल झाला आहे. आरोपी प्रशांत पाटील याला पोलिसांनी अटक केली असून तो मूळचा काळेश्री गावचा व सध्या रामवाडी येथे वास्तव्यास आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता २३ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या प्रकरणी उपविभागीय पोलीस अधिकारी शिवाजी फडतडे यांच्या मार्गदर्शनाखाली व निरीक्षक देवेंद्र पोळ यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निरीक्षक एम. जे. घाडगे अधिक तपास करीत आहेत.

# इन्फिनिटी अकॅडमीच्या यशस्वी प्रशिक्षणार्थींचा गौरव

**माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नाट्य, चित्रपट आणि मालिका क्षेत्रातील तंत्रशुद्ध प्रशिक्षण देणाऱ्या इन्फिनिटी अॅक्टींग आणि मीडिया अकॅडमीच्या वतीने तीन महिन्यांचे शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरात यशस्वी झालेल्या प्रशिक्षणार्थींचा गुणगौरव सोहळा तसेच एकपात्री, द्विपात्री व नाटीका सादरीकरण पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शुक्रवारी (दि.१८) आयोजित करण्यात आले होते. हा कार्यक्रम अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद पनवेल शाखेचे उपाध्यक्ष तथा पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या कार्यक्रमास भाजप सांस्कृतिक सेलचे महाराष्ट्र प्रदेश सहसंयोजक उमेश घळसाशी, सहसंयोजक संचित यादव, कोकण विभाग सहसंयोजक अक्षय चितळे, श्यामनाथ पुंडे स्मिता गांधी, पल्लवी यादव, अभिषेक पटवर्धन, चिन्मय समेळ यांच्यासह पदाधिकारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.




पनवेल परिसरात नाट्यकला रूजावी आणि मुलांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी दीपक पवार यांच्या माध्यमातून सुरू असलेले कार्य महत्त्वाचे असून यामुळे पनवेलचे नाव मोठे होत आहे, असे प्रतिपादन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी या वेळी केले.

या वेळी करणसिंग राजपूत, मयूर ठाकूर, सुनील भारतीय, समर सावंत, युवराज देशमाने, सुरज शिंदे, युक्ता सुर्यवंशी, ऋतूजा पोटे, अस्मिता बोधावडे, अनया पिंगळे, ओबी मोघे, समर्थ वाडेकर, प्रेम पाटील, साहिल मांडे, अमित बोधावडे यांचा गुणगौरव करण्यात आला.



(छाया : राकेश खराडे)

# धरतीने पांघरला हिरवा शालू

**श्रावणसरींची प्रतीक्षा**

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

सध्या पावसाने विश्रांती घेतली असली तरी यापूर्वी तो दमदार बसरला असल्याने सर्वत्र हिरवळ पहावयास मिळत आहे. अशातच श्रावण महिना सुरू झाल्याने वातावरण आल्हाददायक बनत चालले असून पावसाच्या आनंदसरी बरसल्यास दिलासा मिळेल. पावसाचे आगमन झाल्यावर सर्व ठिकाणी चैतन्य निर्माण होत असते. पावसाचे येणे साऱ्यांची भूक शांत करण्यासाठी आवश्यक असते, कारण शेतकरीवर्ग खरिपाचे पीक या काळात घेतो. पशू–पक्ष्यांसाठीही पाऊस फलदायी ठरतो. पावसाळ्यात डोंगर, दरी–खोऱ्यातून वाहणारे फेसाळते धबधबे मनाला आनंद देतात. पक्ष्यांचे थवे, त्यांचा मंजूळ ध्वनीसुद्धा सुखद अनुभव देत असतात.

पावसाच्या पाण्यामुळे नवचैतन्य निर्माण होऊन धरतीला हिरवा साज चढतो. माळरानावर हे दृष्य विशेष मनोहारी दिसते. धरती जणू या हिरव्या रंगाची उधळण करीत आहे की काय असा भास सध्या अनुभवला मिळत आहे.

# इर्शाळवाडी आपदग्रस्त नव्याने रूळू लागले

**दुर्घटनेला एक महिना पूर्ण**

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी दरड दुर्घटनेला शनिवारी (दि. १९) एक महिना पूर्ण झाला. यानिमित्ताने अनेकांनी आपल्या आठवणी जाग्या करून अश्रूंना वाट मोकळी करून दिली. कुणीही मदत कमी पडली असा उच्चार केला नाही. शासन, प्रशासन आणि सेवाभावी संस्थांच्या सहकार्यातून इर्शाळवाडी हळूहळू पुन्हा रूळायला लागली असल्याचे चित्र आहे.

इर्शाळवाडी दुर्घटनेतून सुखरूप बचावलेल्या आपद्ग्रस्तांचे पुनर्वसन होईपर्यंत त्यांची मुंबई–पुणे राष्ट्रीय महामार्गाजवळ तात्पुरत्या स्वरूपात कंटेनर हाऊसमध्ये राहण्याची सोय करण्यात आली आहे. या ठिकाणी १४४ आपद्ग्रस्तांना स्थलांतरित करण्यात आले आहे. येथे दिलेल्या सुविधा आणि पुनर्वसन कामात आम्ही समाधानी असल्याचे





(छाया : अर्जुन कदम)

आपल्या कुटुंबातील पाच जणांना गमावलेले ज्येष्ठ नागरिक कमळू पारधी यांनी सांगितले.

अंतर्गत रस्ते, पाण्याचे नळ, शौचालये, घरांची आतील सुविधा, रोजचे जेवण, नाश्ता, सीसीटीव्ही कॅमेरे, हायमास्ट दिवे, फिल्टरचे पाणी, अंगणवाडी, गुरांचा गोठा, शासकीय दवाखाना, पोलीस व खासगी पहारा, मोबाईल फोन, गॅस शेगडी, सिलिंडर, बिछाना कसली कमतरता नाही अशा चांगल्या परिस्थितीत दुर्घटनाग्रस्त राहत आहेत. तरीही त्यांचे दुःख कमी झाले नाही. कुणी आपला नातू, कुणी मुलगा, कुणी मुलगी, कुणी भाऊ, तर कुणी आई–वडील गमावले आहेत. सर्वांच्या घरी आप्तांच्या तसबिरी लागल्यात.

इर्शाळवाडीची प्राथमिक शाळा शासकीय नियमामुळे बंद पडल्याने शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत दाखल व्हावे लागले. त्यामुळे २२ विद्यार्थी आज या जगात आहेत. आपले दहा सोबती गेल्याचे दुःख अंगणवाडीतील १६ चिमुकल्यांना, त्यांच्या अंगणवाडीसेविकांना आहे. आज मुले खेळताना त्यांच्या नातेवाईकांना आनंद झाला, तर ज्यांची मुले मातीच्या ढिगाऱ्याखाली गेली त्यांच्यापाशी केवळ स्मृती उरल्या आहेत.

आठ वर्षांनी आपली जाऊबाई गरोदर राहिल्याचा आनंद यशवंतच्या पत्नीला झाला होता. आश्रमशाळेतून गटारी अमावस्या साजरी करण्यास आलेल्या लहान भावाला भरपावसात आश्रमशाळेत पाठवल्याने तो तिथे सुखरूप राहिला, पण ती मातीच्या ढिगाऱ्याखाली कायमची गेली, तर आश्रमशाळेत आजारी पडलेला नातू घरी घरी आला व पूर्ण बरा झाला, मात्र परत जाऊ शकला नाही. अशा अनेक आठवणींनी आजचा दिवस अश्रूंना मोकळी वाट करून देण्याचा ठरला.

# माणगाव कार्यालय तोडफोडप्रकरणी मनसे जिल्हाध्यक्षासह पाच जणांना अटक

**जामिनावर सुटका**

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई–गोवा महामार्गाचे काम करणाऱ्या माणगाव येथील चेतक इंटरप्राइझेसच्या कार्यालयात जाऊन तोडफोड केल्याप्रकरणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या दक्षिण रायगड जिल्हाध्यक्षासह पाच कार्यकर्त्यांना स्थानिक पोलिसांनी अटक केली. न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली आहे.

सनी कन्स्ट्रक्शन कंपनी अंतर्गत चेतक इंटरप्रायझेसकडून मुंबई–गोवा महामार्गावरील माणगावमधील इंदापूर ते लाखपाले बायपासचे काम सुरू आहे. मनसेनेच्या कार्यकर्त्यांनी चेतक इंटरप्रायझेसच्या माणगाव गणेश नगर येथील कार्यालयात १६ ऑगस्ट रोजी तोडफोड केली होती.



याबाबत चेतक इंटरप्रायझेसचे सुरक्षा रक्षक रमेश शेलार यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार माणगाव पोलिसांनी मनसेचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष देवेंद्र गायकवाड, कार्यकर्ते संजय बाळकृष्ण गायकवाड, चिमण सुखदरे, केतन गायकवाड, दीपक जाधव अशा पाच जणांना अटक केली. त्यांना शुक्रवारी माणगाव न्यायालयासमोर हजर केल्यावर न्यायालयाने त्यांची जामिनावर सुटका केली. या घटनेचा अधिक तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. पोंदकुळे व पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्री. गायकवाड करीत आहेत.

# जेएनपीएला कोस्टल शिपिंगमध्ये मोठी चालना

## २२,००० एमटी कोस्टल कार्गो शिप एम.व्ही.व्हीटीआरईचे स्वागत

**उरण : प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पत्तन प्राधिकरणाने (जेएनपीए) महाराष्ट्र आणि गुजरातमधील उद्योगांसाठी बनलेल्या ओडिशातील पारादीप येथून टाटा स्टीलच्या २२ हजार एमटी कोल्ड रोल्ड स्टील कॉईल आणणाऱ्या एम.व्ही.व्हीटीआरई कोस्टल कार्गो शिपचे स्वागत करीत एक मैलाचा टप्पा गाठला आहे. १७ ऑगस्ट रोजी १३.२४ वाजता शॅलो वॉटर बर्थ येथे जहाज स्थायिक करण्यात आले. जेएनपीए उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांच्यासह सर्व विभागप्रमुखांनी जहाजाचे स्वागत केले. हा नवीन उपक्रम नवीन पीपीपी ऑपरेटर, मेसर्स न्हावा शेवा वितरण टर्मिनलने साध्य केला असून (एनएसडीटी) (जे. एम. बक्षी ग्रुपच्या मालकीचे) किनाऱ्यावरील शिपिंगला चालना देण्यात एक महत्त्वाचा टप्पा आहे.



पोर्ट टर्मिनल्समध्ये गुंतवणूक आणि ऑपरेट करण्यासाठी जेएनपीए येथे सुविकसित पायाभूत सुविधा वाढवत राहण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून सु-संरचित पीपीपीद्वारे खासगी क्षेत्राच्या सहभागासाठी अनुकूल वातावरण निर्माण केले आहे. त्यानुसार जेएनपीएने मे २०२३मध्ये न्हावा शेवा वितरण टर्मिनलशी शॅलो वॉटर बर्थ (एसडब्ल्यूबी) आणि कोस्टल बर्थ (सीबी) विकसित आणि ऑपरेट करण्यासाठी ३० वर्षांचे कन्सेशन अग्रीमेंट केले आहे. बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली जेएनपीए सक्रियपणे कार्यरत असून सागरी वाहतूक वाढवण्यासाठी, रस्ते कमी करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून किनारी शिपिंगला प्रोत्साहन देणे, गर्दी आणि कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रयत्नशील आहे.

भारतातील ७,२०० किमीच्या किनारपट्टीसह शिपिंगला चालना देण्याची गरज आहे. भारत सरकारच्या सागरमाला उपक्रमांतर्गत आधुनिकीकरण करून बंदराच्या नेतृत्वाखालील विकासावर लक्ष केंद्रित करणे, बंदरे, किनारी आणि अंतर्देशीय जलमार्ग विकसित करणे, किनाऱ्यावरील शिपिंग, लॉजिस्टिकला प्रोत्साहन देणे व वाहतूक खर्च कमी करणे यावर भर देत आहे. अर्थव्यवस्थेच्या प्रमाणामुळे सागरी वाहतूक हा एक स्वस्त पर्याय आहे, जो रोड सेक्टरचा भार कमी करतो. या नवीन उपक्रमामुळे जमिनीपासून ते समुद्रीमार्गांवर पोलाद उत्पादनांच्या वाहतुकीचे मॉडेल बदलण्याचा मार्ग सुकर होईल.

भारताच्या पूर्व किनाऱ्यावरून पोलाद उत्पादनांची वाहतूक शेवटपर्यंत केली जाईल ज्यामध्ये पुणे व महाराष्ट्रातील इतर भागातील ग्राहकांचा समावेश असेल असा अंदाज आहे की, ईस्ट कोस्टवरून स्टील आणि गुजरातमधून सिमेंटची शिपमेंट एसडब्ल्यूबी आणि सीबी येथे मिळणे अपेक्षित आहे. एक शिपमेंट शहरावरील सुमारे दोन हजार ट्रक वाहतूक कमी करण्याइतके आहे, ज्यामुळे रस्त्यांवरील गर्दी व कार्बन उत्सर्जन कमी होण्यास मदत होईल. जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, ही कोस्टल मूव्हमेंटसाठी नवीन सुरुवात आहे. भारतातील पूर्वेकडील बंदरांपासून ते पश्चिमेकडील बंदरांपर्यंत समुद्रमार्गे देशांतर्गत मालवाहतूक होईल, ज्यामुळे महाराष्ट्र, गुजरातमधील उद्योगांच्या विकासाला चालना मिळेल.

## उरण मोरा येथील साई मंदिरात चोरी

### मूर्ती आणि दानपेटीतील पैसे केले लंपास

**उरण : प्रतिनिधी**



मोरा सागरी पोलीस ठाण्याजवळील श्री साई दरबार मंदिरात शुक्रवारी (दि. १८) रात्री अंधारात चोरीची घटना घडली. चोरट्यांनी मंदिरातील धातूची मूर्ती तसेच दानपेटीतील पैसे लंपास केल्याचे समोर आले.

या प्रकरणी मोरा सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पहाटे साईभक्तांना मंदिरात चोरी झाली असल्याचे निदर्शनास आले. या घटनेचे गांभीर्य ओळखून भाविकांनी मोरा सागरी पोलीस ठाण्याला माहिती दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक दीपक इंगोले यांनी तत्काळ ठसेतज्ज्ञांना पाचारण करून चोरीसंदर्भात माहिती गोळा करण्यास सुरुवात केली आहे. प्रथमदर्शनी तपासात मंदिरातील एक लहान धातूची मूर्ती तसेच दानपेटीतील पैसे चोरट्यांनी लंपास केल्याची माहिती पोलीस सुत्रांकडून सांगण्यात येत असून वरिष्ठ निरीक्षक दीपक इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा चोरट्यांचा शोध घेत आहेत.



**पनवेल : प्रभाग क्रमांक १९मध्ये रोहिदास वाडा जरीमरी आई मंदिर परिसरात कचरा टाकला जात होता. त्यामुळे दुर्गंधी पसरत होती. ही बाब माजी नगरसेविका दर्शना भोईर यांना समजताच त्यांनी महापालिकेच्या निदर्शनास आणून दिली. त्यानुसार कचरा टाकल्या जाणाऱ्या जागेवर झाडांच्या कुंड्या ठेवण्यात आल्या आहेत, जेणेकरून हा परिसर सुशोभित दिसेल व कचरा टाकणे आपोआप बंद होईल. या कार्यवाहीवेळी आरोग्य अधिकारी महेंद्र भोईर, भाजपचे मधुकर उरणकर आदी उपस्थित होते.**

## खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये करिअर मार्गदर्शन



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात शनिवारी (दि. १९) सकाळी ११ वाजता सेंटर फॉर करिअर गायडन्स प्लेसमेंट व ट्रेनिंग, स्किल डेव्हलपमेंट सेल, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ इंटिग्रेटेड टेक्निकल स्टडीज पनवेल व कोकण दर्पण (वृत्तपत्र व चायनल) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयातील सर्व शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते.

या सत्रासाठी प्रमुख पाहुणे म्हणून संजय महाडिक हे उपस्थित होते तसेच या सत्रासाठी प्रमुख वक्ते म्हणून डॉ. राज सिकदार यांनी उपस्थित राहून महाविद्यालयातील सर्व विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींना वेगवेगळ्या क्षेत्रात करिअरविषयी असणाऱ्या संधी तसेच निवड प्रक्रिया याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेतील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींना करिअर विषयक मार्गदर्शन केले व सत्रासाठी शुभेच्छा दिल्या.

या करिअर मार्गदर्शन सत्राचे आयोजन सेंटर फॉर करिअर गायडन्स प्लेसमेंट व ट्रेनिंगचे समन्वयक प्रा. रेवन शिंदे व स्किल डेव्हलपमेंट सेलच्या समन्वयक प्रा. रूपाली नागरीकर यांनी केले तसेच प्रा. महेश धायगुडे, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. सायमा नाटेकर, प्रा. डॉ. कविता शिंदे, प्रा. योगिता पाटील व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले. या उपक्रमासाठी अंतर्गत गुणवत्ता सिद्धता कक्षचे समन्वयक प्रा. महेश्वरी झिरपे तसेच सर्व विभागाचे विभाग प्रमुख, सर्व प्राध्यापक हे सर्व उपस्थित होते.

## गव्हाण विद्यालयात व्यावसायिक मार्गदर्शन परिसंवाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पारंपारिक अभ्यासक्रमाच्या चौकटीत बंदिस्त न होता आणि पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून न राहता आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाच्या जोडीने माहिती व तंत्रज्ञानाच्या साहाय्याने विद्यार्थ्यांनी अधिक कृतीशील तथा गतीशील होऊन व्यावसायिक दृष्टिकोन वृद्धींगत करावा या हेतून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये व्यवसाय मार्गदर्शन परिसंवादाचे आयोजन करण्यात आले.

विद्यालयातील इयत्ता अकरावी आणि इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी या खास शिबिराचे आयोजन करण्यात आले. संगणक प्रशिक्षणासाठी ख्यातकीर्त असणाऱ्या उलवे येथील दिशा कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या वतीने विद्यालयातील ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांना व्यवसाय मार्गदर्शन परिसंवादातून विविध क्षेत्रातील उपलब्ध संधींची माहिती देत समुपदेशन करण्यात आले.यामध्ये अकाउंटन्सी अँड टॅक्सेशन तसेच जी.एस.टी. आणि इन डिझाईन 2D CAD , 3D CAD विषयी सखोल मार्गदर्शन करून उपलब्ध संधींची कल्पना देण्यात आली.



व्यवसाय मार्गदर्शन परिसंवादामध्ये 'ग्राफिक्स अँड निमेशन' तसेच 'अकौंटन्सी अँड टॅक्सेशन' याविषयीचे देखील मार्गदर्शन या परिसंवादात करण्यात आले. विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांच्या हस्ते या परिसंवादाचे उद्घाटन करण्यात आले.दिशा कम्प्युटर इन्स्टिट्यूटचे केंद्र प्रमुख ज्ञानेश खेंगरे,शाखा व्यवस्थापिका सुचिता कोळी,व्यवस्थापक अंकुश मोहिते,तसेच प्रशिक्षिका जान्हवी चिकने आणि शितल साळुंखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक तथा प्रभारी प्राचार्य प्रमोद मंडले यांचेसह रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख बाबुलाल पाटोळे यांचेसह ज्युनिअर कॉलेज शिक्षक माणिक घरत, राजू खेडकर, उमेश पाटील, जयवंती ठाकूर आणि अर्चना पाटील तसेच इयत्ता अकरावी आणि बारावीचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पिसाळलेले कुत्रे जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा सेक्टर १० मधील कैलास, अंबिका अपार्टमेंट, अर्चिड सोसायटी परिसरात पिसाळलेल्या कुत्र्याने आठ ते दहा व्यक्तींचा चावा घेतला. पालिका प्रशासनाने याचा शोध घेत पाच कुत्रे जेरबंद करीत त्यांची रवानगी पालिकेच्या श्वास नसबंदी केंद्रात केली.

पनवेल मनपा श्वान नसबंदी विभागाचे डॉ.बी.एन.गिते यांनी मोकाट कुत्रे ज्या भागात आहेत, तेथील माहिती दिल्यास कारवाई केली जाईल, असे सांगितले.

## जासई येथे सर्प साक्षरता अभियान उत्साहात

**उरण : बातमीदार, वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर आर्ट्स सायन्स व कॉमर्स महाविद्यालय, महालण विभागाच्या प्राणिशास्त्र विभाग व फ्रेंड्स ऑफ नेचरच्या वतीने छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेज जासई येथील विद्यार्थ्यांसाठी सर्प साक्षरता अभियान घेण्यात आले.



नुरा शेख यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली, तर प्राचार्य अरूण घाग यांनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वीर वाजेकर कॉलेजचे प्राणिशास्त्र विभाग प्रमूख, डॉ आमोद ठक्कर यांनी केले त्यात त्यांनी सर्प त्यांची संख्या, विषारी बिन विषारी व निमविषारी असतात ह्याची माहिती दिली. सर्प दंशामुळे साधारणतः सरकारी आकड्यांनुसार दरवर्षी ६० हजार मृत्यू होतात नोंद नसलेली आकडेवारी आणखी मोठी आहे. हे मृत्यू अनेक वेळेस अज्ञान, अंधश्रद्धा चुकीच्या उपचार पद्धतीचा वापर किंवा वेळेत योग्य उपचार न मिळणे अशी अनेक कारणे आहेत जी आपण सर्प साक्षरतेचे धडे घेऊन सर्पदंश शून्य मृत्यू अभियानाला हातभार लावुन कमी करावे, असे आवाहन केले.

प्रमुख वक्ते फ्रेंडस ऑफ नेचरचे जयवंत ठाकूर ह्यांनी विषारी सर्प नाग, मण्यार, घोणस, फुरसे, चापडा, समुद्र सर्प यांना कसे ओळखायचे, त्यांचा खुराक सवयी इत्यादींची सविस्तर माहिती दिली तसेच निमविषारी व अनेक बिनविषारी सर्प ह्यांची ही सचित्र ओळख करून दिली.

कार्यक्रमाच्या नियोजनात शाळा विकास समितीचे अध्यक्ष तथा कामगार नेते सुरेश पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. पंकज भोये, निकेतन ठाकूर, माजी विद्यार्थी आणि फॉन (फ्रेंड्स ऑफ नेचर) संस्थेचे पदाधिकारी,सदस्य ह्यांचे सहकार्य लाभले. शुभांगी ठाकूर यांनी आभार मानले.

पान १ वरून

## १ ऑक्टोबरला मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिर

कामोठे अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, अमित जाधव, महिला मोर्चाच्या तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, ओबीसी सेलचे जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, भाजपचे शहर सरचिटणीस अमरीश मोकल, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, सांस्कृतिक सेलचे जिल्हाध्यक्ष अभिषेक पटवर्धन, कामगार नेते रवी नाईक, संजय भगत, अनेश ढवळे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणाऱ्या या महाशिबिरात सर्वसाधारण रोग तपासणी, बालरोग तपासणी, महिलांचे आजार, त्वचारोग तपासणी, हृदयरोग तपासणी, दंतरोग तपासणी, मधुमेह तपासणी, नाक, नाक व घसा तपासणी, हाडांचे रोग तपासणी, नेत्र तपासणी व चष्मेवाटप आयुर्वेद अशा विविध आरोग्य तपासण्यांसह औषधोपचार देण्यात येणार आहेत. दरवर्षी १५ हजारहून अधिक नागरिक या महाशिबिराचा लाभ घेत असतात. त्यामुळे नियोजनात कोणतीही कसर राहू नये यासाठी सर्व गठीत समित्यांनी आपापली जबाबदारी नेहमीप्रमाणे योग्यरीत्या पार पाडावी, असे आवाहनही अरुणशेठ भगत यांनी या वेळी केले तसेच पुढील आठवड्यात पुढील नियोजन बैठक होणार असल्याचे सूचित केले.

## रतन टाटांना उद्योगरत्न पुरस्कार प्रदान


महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या नामवंत उद्योजकांना महाराष्ट्र भूषण पुरस्काराच्या धर्तीवर या वर्षीपासून राज्य शासनाने महाराष्ट्र उद्योग पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे. यात उद्योगरत्न पुरस्कार ज्येष्ठ उद्योजक पद्मविभूषण रतन टाटा, उद्योगमित्र पुरस्कार सिरम इन्स्टिट्यूटचे अदर पुनावाला यांना, तर उद्योगिनी पुरस्कार किर्लोस्कर समूहाच्या गौरी किर्लोस्कर, उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्कार विलास शिंदे यांना जाहीर करण्यात आला आहे. हे पुरस्कार रविवारी (दि. २०) समारंभपूर्वक राज्यपाल रमेश बैस यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहेत. हा समारंभ वांद्रे-कुर्ला संकुलमधील जीओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधील जास्मिन हॉलमध्ये दुपारी २ वाजता होणार आहे.

उद्योगमित्र पुरस्काराचे स्वरूप १५ लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र, उद्योगिनी पुरस्काराचे स्वरूप पाच लाख, सन्मानचिन्ह व मानपत्र, तर उत्कृष्ट मराठी उद्योजक पुरस्काराचे स्वरूप पाच लाख, सन्मानचिन्ह आणि मानपत्र असे आहे.

## सद्भावना दिनानिमित्त कोकण भवनात प्रतिज्ञा

**नवी मुंबई : बातमीदार**

माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांना जयंतीनिमित्त कोकण भवनात शुक्रवारी (दि. १८) अभिवादन करण्यात आले. यानिमित्त पाळण्यात येणाऱ्या सद्भावना दिनानिमित्ताने उपायुक्त (महसूल) विवेक गायकवाड यांनी उपस्थितांना सद्भावना प्रतिज्ञा दिली.



केंद्र शासनाच्या निर्देशानुसार राज्य शासनाने २० ऑगस्टला माजी पंतप्रधान स्व. राजिव गांधी यांच्या जयंतीनिमित्त सद्भावना दिन साजरा करण्याचे आदेश निर्गमीत केले आहेत. दरवर्षी २० ऑगस्ट रोजी राजीव गांधी यांची जयंती सदभावना दिन म्हणून साजरी केली जाते. या दिवशी, प्रदेश, धर्म, भाषा यांचा विचार न करता सर्व लोकांच्या भावनिक ऐक्यासाठी आणि सद्भावनेसाठी शपथ घेतली जाते. २० ऑगस्ट रोजी शासकीय सुटी असल्याने शनिवारी कोकण भवनात दिवंगत राजीव गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले तसेच कोकण भवनातील पहिल्या मजल्यावर असलेल्या आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृहात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची प्रतिज्ञा देण्यात आली.

## 'पनवेल मनपाच्या रुग्णालयांत इतर आजारांवरही उपचार मिळावा'

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात आरोग्य केंद्र सुरू केली जात आहेत. या ठिकाणी प्राथमिक उपचार रुग्णांना मिळणार आहेत, मात्र इतर आजारांवर उपचार देण्यासाठी मनपा हॉस्पिटल सुरू करण्याची मागणी स्त्री शक्ती फाउंडेशनच्या संस्थापिका विजया कदम यांनी केली आहे.


इतर स्वरूपाच्या वैद्यकीय सुविधा मिळाव्यात. रुग्णांना ॲडमिट करून घेऊन त्यांना चांगले उपचार मिळावेत यासाठी पनवेल महापालिकेचे हॉस्पिटल असणे आवश्यक आहे.

कळंबोली आणि इतर ठिकाणी अशा प्रकारचे दोन रुग्णालय सुरू करण्याबाबतची घोषणा मनपा आयुक्त गणेश देशमुख केली होती. याबाबत जलद गतीने कार्यवाही होणे अपेक्षित आहे, असे त्या म्हणाल्या.

**पनवेल महापालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्राथमिक उपचार दिले जातात, मात्र रुग्णांना हॉस्पिटलाईज करायचे असल्यास खासगी रुग्णालयात जावे लागते. या पार्श्वभूमीवर महापालिकेने स्वतःचे हॉस्पिटल सुरू करावे. -विजया कदम, स्त्री शक्ती फाउंडेशन**

**दुखवटा**

## दामा फाटे



**चौक :** खालापूर तालुक्यातील कोपरी गावचे सामाजिक क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती हभप दामा गोविंद फाटे (वय १०३) निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच मुले असून आहेत. सामाजिक कार्यकर्ते, दानशूर व्यक्ती गमावल्याची भावना फाटे यांच्या अंत्यविधीस उपस्थितांनी व्यक्त केली.

## निवडक

### अल्पवयीन मुलाला पळविले



**पनवेल :** एक ११ वर्षीय मुलास अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणाकरिता कायदेशीर रखवालीतून नेले फुसलावून पळवून नेल्याची घटना तालुक्यातील पेंधर गाव येथे घडली आहे. विकास कुशियाली अनुरागी (वय ११ वर्ष १ महिना) अंगाने मध्यम, रंग सावळा, चेहरा गोल, डोळे काळे व मोठे, केस काळे, कपाळावर जुन्या जखमेची खुण, अंगात निळ्या रंगाचे शर्ट व काळ्या रंगाची हाफपॅन्ट आहे. या मुलाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी तळोजा पोलीस ठाणे किंवा सहायक पोलीस निरीक्षक अंबिका अंधारे (८७८८२८६०६४) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नवीन पनवेल परिसरात घरफोडी

**पनवेल :** नवीन पनवेल सेक्टर एक येथील एक बंगल्यात एका अज्ञाताने प्रवेश करून घरात घरफोडी करून ६७ हजार ५०० रुपयांचे दागिने आणि ६० हजार रुपयांची रोख रक्कम चोरून नेली आहे. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवीन पनवेल सेक्टर १, प्लॉट नं १० सृष्टी बांगला येथे राहणारे अमोल प्रभाकर उरणकर हे आपल्या परिवारासह पोलादपूर येथे घरातील एका कार्यक्रमासाठी गेले होते. घरात कोणीही नसल्याचा फायदा घेत एका अज्ञाताने घरात प्रवेश करून ६७ हजार ५०० रुपये किमतीचे दागिने आणि ६० हजार रुपये चोरून नेले. दरम्यान, अमोल प्रभाकर उरणकर हे घरी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी खांदेश्वर पोलीस ठाण्यात याची तक्रार दाखल केली आहे त्यानुसार एका अज्ञात इसम विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

**उरण :** महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना उरण यांच्या वतीने उरण येथील नाईक नगर झोपडपट्टीत गरजू विद्यार्थ्यांना शाळेपयोगी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या वेळी उरण पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिश निकम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. कोणाला काही अडचण असेल, समस्या असेल तर पोलीस स्टेशनला संपर्क साधण्याचे त्यांनी आवाहन केले. आदर्श शिक्षिका सुनंदा कुमार मॅडम यांचा वाढदिवस सुद्धा साजरा करण्यात आला. या वेळी महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे गणेश पाटील, वैभव पवार, राजेश म्हात्रे, प्रशांत भोईर, जयेश मोकल, रवी मोकल, स्वप्नील कुंभार आदी उपस्थित होते. पप्पू सूर्यराव यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



# निवृत्त सैनिकांना कोट्यवधींचा गंडा

## नोकरीचे आमिष दाखवून ३१ जणांची फसवणूक



## खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल

**खारघर : प्रतिनिधी,**
**पनवेल : वार्ताहर**

कामाच्या आमिषाने आर्थिक फसवणुकीचे प्रकार सर्रास घडत असतात. दररोज याबाबत बातम्या वाचायला मिळतात, मात्र देशाच्या सीमेचे रक्षण केलेल्या निवृत्त सैनिकांना देखील गंडवण्याचे प्रकार सुरू आहेत. खारघर पोलीस ठाण्यात याबाबत ३१ जणांनी लेखी तक्रार दाखल केली असुन यामध्ये जवळपास २९ सैनिक आहेत.

मागील दोन वर्षांपासून टप्प्याटप्प्याने ३१ जणांकडून ठराविक पैसे आकारल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. हि रक्कम दोन लाखांपासून अठरा लाखांपर्यंतच्या घरात आहे. निवृत्त सैनिक असलेले सदानंद बाळकृष्ण भोसले नामक व्यक्तीने हि फसवणूक केल्याचा आरोप ३१ जणांनी केला आहे. संबंधित व्यक्ती खारघर शहरात राहत असल्याचे सांगण्यात येत आहे. यानंतर निवृत्त सैनिकांनी याबाबत खारघर पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. आरबीआयमध्ये नोकरी लावण्याच्या आमिषाने हि फसवणूक करण्यात आली आहे. फसवणूक झालेल्यामध्ये पनवेल, मुंबई, पुणे आणि कोंकणातील निवृत्त सैनिकांचा समावेश आहे. नोकरी लागण्यासाठी अनेकांनी कर्ज काढले आहे, मात्र नोकरी तर सोडाच आमच्यावर उपासमारीची वेळ आली असल्याचे फसवणूक झालेले निवृत्त सैनिक संजय पवार यांनी सांगितले.

फसवणूक केलेला व्यक्ती सर्रास खुलेआम बाहेर फिरत आहे. पैशाबाबत विचारणा केली असता मी तुम्हाला पैसे परत करेन असे खोटे आश्वासन आम्हाला देत असल्याचे संजय पवार यांनी सांगितले. सदानंद बाळकृष्ण भोसले नामक व्यक्तींशी याबाबत संपर्क साधला असता त्यांचा फोन बंद असल्याचे पहावयास मिळाले.


> **निवृत्त सैनिकांच्या आर्थिक फसवणुकीची तक्रार आम्हाला प्राप्त झालेली आहे. २५ लाखांपेक्षा जास्त आर्थिक फसवणुकीचे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला जातो.त्यानुसार आम्ही हे प्रकरण आर्थिक गुन्हे शाखेकडे पाठवल्यांनंतर निश्चितच यासंदर्भात तथ्य पाहुन गुन्हा दाखल होईल.**
> **–राजीव शेजवळ,**
> **वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खारघर**





**पनवेल : महापालिकेच्या वतीने शहरातील शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये शेड उभारण्यात येत आहे. या शेडच्या कामाची तसेच शहरातील पावने बंगला ते शाह प्लाझापर्यंतच्या रोडची पाहणी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शुक्रवारी केली. या वेळी त्यांनी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना केल्या. पाहणीवेळी माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, महापलिकेचे संजय कटेकर, तुषार कापरे आदी उपस्थित होते.**
(छाया : योगेश पाटील)

# पाताळगंगातील गोदाम जळून खाक



**मोहोपाडा, खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मोहपाडा येथील कैरे गावाजवळ असलेल्या जगदिश प्रा. लिमीटेड कंपनी राजकुमार शर्मा वेअरहाऊस हे लाकडी व प्लास्टीक पॅलेट बनविण्याच्या गोदामाला शुक्रवारी (दि. १८) सायंकाळी सहानंतर आचानक आग लागली. नऊ तासानंतर शनिवारी पहाटे तीन वाजता आगीवर नियंत्रण मिळविण्यास यश आले.

**नऊ तासांनंतर आगीवर नियंत्रण**

या आगीने रौद्ररूप धारण केल्याने रसायनी परिसरात सर्वत्र धुराचे लोट दिसून आले. या गोदामात रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड पाताळगंगा व इतर कंपन्यांचे पॅलेट बनविले जात होते. आग विझवण्यासाठी रिलायन्स इंडस्ट्रीजचे तीन अग्निशमन दल, पाताळगंगा एमआयडीसी एक, टाटा कंपनीचा एक, खोपोली नगरपालिका एक, पेण नगरपालिका एक, पनवेल महापालिका एक,तळोजा एमआयडीसी एक अशा नऊ अग्निशमन दलानी जवळपास एकूण ७० ते ७५ फेऱ्या मारुन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. अखेर नऊ तासानंतर शनिवारी पहाटे तीन वाजता आगीवर नियंत्रण मिळविण्यास यश आले.

या वेळी घटनास्थळी रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शत्रुघ्न माळी, सहाय्यक निरीक्षक गोरक्षनाथ बाळवडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस यंत्रणा तैनात होती.तहसीलदार आयुब तांबोळी, नायब तहसीलदार, मंडळ अधिकारी खेडकर, वीज वितरणचे उपअभियंता गलांडे तसेच परिसरातील मान्यवर, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी घटनास्थळी हजर होते.

### सुदैवाने जीवितहानी नाही

**दरम्यान, या गोदामातील कामगार दिवसपाळी करून घरी गेल्याने कोणतीही जीवितहानी झाली नाही, मात्र गोदामातील माल आगीत खाक झाला आहे. नेमकी आग कशामुळे लागली आणि किती नुकसान झाले याचा अंदाज अद्यापपर्यंत समजला नाही.**

# करंजाडे येथे मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी शिबिर



## वाढदिवसानिमित्त स्तुत्य उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सिद्धांत सामाजिक साहिक्षणिक कला क्रिडा आणि सांस्कृतिक संस्थेचे उपाध्यक्ष रूपेश जाधव यांचा वाढदिवस शनिवारी (दि. १९) सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त संस्थापक अध्यक्ष सागर जाधव आणि कार्याध्यक्ष संतोष कांबळे यांच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर आणि डोळे तपासणी शिबिराचे आयोजन करंजाडे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवनामध्ये करण्यात आले होते.

या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत रूपेश जाधव यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तसेच आरोग्य शिबिर आयोजित केल्याबद्दल कौतुक केले. या शिबरात शुश्रूषा सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे नागरिकांसाठी हृदयाच्या तपासणी, ईसीजी, शुगर, बीपी आदी तपासण्या करण्यात आल्या असून शिबिराला नागरीकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या वेळी करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, सदस्य बिपीन गायकवाड, मयूर जाधव, प्रकाश जाधव, सारंग जाधव, नवनाथ पाटील, ॲड. सचिन कांबळे, मिलिंद कांबळे, सतेज गुरव, निलेश कांबळे, अविनाश अडगले, प्रतिक गायकवाड, राजू रोडे, पवन निखाडे, सुनील गायकवाड, निलेश कांबळे, तेजस जोशी, प्रवण गायकवाड, सौरभ कांबळे, समीर गायकवाड आदी उपस्थित होते.

# मोहोपाडा परिसरातील शेकाप, ठाकरे गट कार्यकर्त्यांच्या प्रवेशाने भाजप अधिक मजबूत

(छाया : प्रफुल्ल कांबळे)



**मोहोपाडा : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील मोहोपाडा येथे शेतकरी कामगार पक्ष व उद्धव ठाकरे गटाच्या तब्बल २०० कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी (दि.१६) प्रवेश केला. या वेळी मंत्री रवींद्र चव्हाण यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे पक्षात स्वागत केले. मोहोपाडा परिसरातील शेकाप, ठाकरे गटातील कार्यकर्त्यांच्या प्रवेशाने भाजपला बळकटी मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी मोहोपाडा परिसरातील शेकाप, ठाकरे गटातीलतील प्रमुख पदाधिकारी, मान्यवरांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. यासोबतच राघो अशा वाघ, बुधाजी आल्या वाघ, तुकाराम धर्मा लेंडे, बाळू धावू वाघ, काळू आंबो वाघ काशिनाथ हिरु वाघ, नागेश बुधाजी वाघ, गोविंद सोमा ढुमना, धाऊ आल्या वाघ, सुरेश रमेश वाघ, कृष्णा माया निरगुडा, मधुकर बुधाजी वाघ, परशुराम हिरु हिरवे, अंकुश महादू वाघ, विष्णू देऊ उघडे, परशुराम हिऱ्या वाघ, हरचिंद्र अंनता निरगुडा, आकाश गोमा ढुमना, सखाराम हिरु वाघ, लहू आल्या वाघ, सुरेश परशुराम वाघ, भाऊ बंडू होला, लक्ष्मण मधुकर ढुमना, संतोष मधुकर निरगुडा, राज नागेश वाघ, काशिनाथ मधुकर निरगुडा, गणेश बाळ्या निरगुडा, काशिनाथ भाऊ वाघ, वासुदेव विष्णू उघडे, राकेश हिरु हिरवे, लवा काळू वाघ, अनंता हिऱ्या वाघ,काळू बाज्या दुमना, भास्कर कश्या वाघ, चेंद्रकांत पडू ढुमना, महेश लहू वाघ, वैभव परशुराम वाघ, हिरामण तुकाराम लेंडे, मिलीन मधू वाघ, दीपक काळुराम ढुमना, गणेश नागेश वाघ, मंगेश नागेश वाघ, मधुकर होला, मधुकर दामा वाघ, अनंता नारायण निरगुडा, सवणे गावातील देवेंद्र देशमुख, स्वरूप सरदार, अक्षय देशमुख, नयन सरदार, शाहिल देशमुख, तेजेश देशमुख, प्रशांत देशमुख, सवणे आदिवासीवाडीतील शिवराम पवार, अजय पवार, गोपिनाथ पवार, अरुण पवार, वसंत पवार, नामदेव पवार, माळ्या पवार, विजय पवार, नामदेव वाद्ये, शास्कर पवार, घोडू पवार, लक्ष्या पवार, मधुकर पवार, गायचरण वाडी सवणेतील नरेश वाघ,नाना वाघम, हनुमंत वाघ, हसुराम वाघ, गोवींदा वाघ, दत्ता वाघ, जानू दरवडा, किसन वाघ, जोमा वाघ, रवींद्र कातकरी, किसन कातकरी, बारखा कातकरी,दत्ता वाघे, कृष्णा वाघमारे, सुरेश पवार, शंकर पवार, गुरुनाथ पवार, हिरामण पवार, किशोर पवार, राजा पवार, राजेंद्र पवार, संतोष पवार यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला.

या कार्यक्रमास भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, उरण विधानसभा मतदारसंघ प्रमुख अरुणशेठ भगत, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तुपगाव सरपंच रवींद्र कुंभार, वासांबे जि. प. विभागातील भाजपचे सदस्य, माजी उपसभापती देवीदास पाटील, गुळसुंदे जि. प. अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, माजी सरपंच किरण माळी, गोपीनाथ जाधव, संजय खंडागळे, पनवेल मनपा माजी नगरसेवक बबन मुकादम यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# सीकेटी महाविद्यालयातर्फे दुंदरे येथे वृक्षारोपण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग, लायन्स क्लब नवीन पनवेल आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ, पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. १५) ग्रुप ग्रामपंचायत दुंदरे (तानसई) येथे वृक्षारोपण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी ग्रुप ग्रामपंचायत दुंदरेचे सदस्य, पदाधिकारी, स्वयंसेवक आदींची उपस्थिती लाभली.

आझादी का अमृत महोत्सवाच्या श्रेणीतील मेरी माटी मेरा देश या उपक्रमांतर्गत महाविद्यालयात बहुविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असून. याच शृंखलेत एक स्वयंसेवक एक झाड या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमदिनी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक तथा कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या चमुने सकाळी उपक्रमस्थळाकरीता महाविद्यालयातुन प्रस्थान केले. या चमूचे ग्रुप ग्रामपंचायत दुंदरेचे सदस्य आणि कर्मचाऱ्यामार्फत स्वागत करण्यात आले.

मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपणाच्या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. यासोबतच उपस्थित विद्यार्थी, स्वयंसेवक आणि कार्यक्रम अधिकारी यांनी वेगवेगळ्या प्रकाराच्या एकूण ५०० रोपांची लागवड करत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या वेळी ग्रुप ग्रामपंचायत दुंदरेचे सर्व माजी सदस्य आणि ग्रामसेवक मोहन पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले.

वृक्षारोपण मोहिमेच्या यशस्वी नियोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी डॉ. सुर्यकांत परकाळे, महिला कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनिव, कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील, प्रा. आलोक भानुशाली, प्रा. राहुल पाटील, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. रुपाली आगलावे, इंग्रजी विभागाच्या प्राध्यापिका रेणुका गणेशे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# खारघरच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे स्वागत





**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शनिवारी (दि. १९) अकरावीच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या प्रमुखपदी संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, संजय भगत आणि प्राचार्या निषा नायर हे होते.

या कार्यक्रमास विद्यार्थ्यांसोबत त्यांच्या पालकांनाही आमंत्रित करण्यात आले होते. प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना व पालकांना जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेची ओळख करून दिली. त्याचप्रमाणे वर्षभर राबविण्यात येणाऱ्या निरनिराळ्या शालेय उपक्रमाबद्दल माहिती देण्यात आली. प्राचार्यांनी आपल्या शब्दसुमनांनी जीवनातील ध्येयाचे महत्त्व सांगितले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यास सर्व शिक्षकवृंद आणि सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# निमित्त फोटोग्राफी दिवसाचे...
## (सेटवर ते विमानतळावर)

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

**स्थळ मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ...वेळ अक्षरश: कोणतीही...**जणू चोवीस तास सर्व्हीस सुरू. तेवढ्यात आपल्या प्रशस्त गाडीतून दीपिका पादुकोण अथवा श्रध्दा कपूर उतरते आणि त्या क्षणापासून ते सिक्युरिटीजला आपला पासपोर्ट, तिकीट दाखवेपर्यंत धडाधड फोटो फ्लॅश उडताहेत. व्हिडिओ शूटिंग होतेय. सेलिब्रिटीज चालतेय आणि हे लाईव्ह अथवा कॅन्डीड फोटो काढणारे मॅडम... एक मिनिट... मॅडम जरा इधर... मॅडम रुको करताहेत. एकादी रक्ष्मिका मंदाना आपला वेग कमी करते.

अशा 'चालत्या फिरत्या हसत्या' सेलिब्रिटीजचा फोटो काढण्यापर्यंत ही झक्कास प्रगती झाली आहे. मिडियाचे फोटोग्राफर आणि चित्रपट कलाकार या घट्ट नात्याचा प्रवास खूपच मोठा, वळणावळणाचा, काही गोष्टी, किस्से, कथा, दंतकथा असणारा असा आहे. फोटोग्राफी दिवसाच्या (१९ ऑगस्ट) निमित्ताने हा फोकस.

फार पूर्वी चित्रपटाच्या सेटवर स्टील फोटोग्राफर जे फोटो काढायचा त्याचीच कॉपी मिडियात यायची. आणि त्यात गैर असे काहीच नव्हते. आणि जुन्या चित्रपटांच्या आठवणीत असेच एकाद्या दृश्याचे फोटो त्या चित्रपटाचे व्यक्तिमत्व अधोरेखित करतात. तात्पर्य, सेटवर फोटो निघाले आणि त्याची कॉपी निघाली असे होत नाही. के. असिफ दिग्दर्शित 'मुगल ए आझम', मेहबूब खान दिग्दर्शित 'मदर इंडिया', गुरुदत्त दिग्दर्शित 'प्यासा', विजय आनंद दिग्दर्शित 'गाईड', शक्ती सामंता दिग्दर्शित 'आराधना', गुलजार दिग्दर्शित 'आंधी', यश चोप्रा दिग्दर्शित 'चांदनी' , सूरजकुमार बडजात्या दिग्दर्शित 'हम आपके है कौन' अशी अनेक लक्षवेधक उदाहरणे आहेत.

स्टार्सच्या फोटो सेशनचे कल्चर गाजल्याची उदाहरणे अनेक. साठच्या दशकाच्या उत्तरार्धात शर्मिला टागोरने एका प्रख्यात गॉसिप्स मॅगझिनच्या मुखपृष्ठासाठी जुहूच्या एका पंचतारांकित हॉटेलच्या स्वीमिंग पूलावर केलेले बेदिंग सूटातील फोटो सेशन चक्क खळबळजनक ठरले. पारंपरिक रूपातील अभिनेत्री अशा तिच्या इमेजला या फोटो सेशनने धक्काच बसला. तो काळही नायिका म्हणजे पारंपरिक साडीतील रूप आणि व्हॅप म्हणजे पाश्चात्य रूप असे सरळ सोपे वर्गीकरण. म्हणून तर शर्मिला टागोरचं असं बोल्ड रूपडं म्हणजे, सांस्कृतिक धक्काच.


याच काळात फोटो सेशन कल्चर रुजायला सुरुवात झाली आणि त्यासाठी गॉसिप्स मॅगझिनची ग्लॉसी पेपर्सची सुपिक खेळपट्टी मिळाली. रेखाने यात घेतलेली आघाडी आजही कायम आहे. देशविदेशातील कोणत्याही फॅशनमधलं फोटो सेशन असू देत. रेखा छा गयी हे समीकरण हुकमी. राम औरंगाबादकर, गौतम राजाध्यक्ष, जगदीश माळी, सॅबी सॅम्युअल, विकी हांडा असे अनेक फोटोग्राफर आपल्या कॅमेऱ्यातून अनेक चित्रपट कलाकारांना 'जणू वेगळ्याच विश्वातील सौंदर्य ' अशा प्रकारे दाखवू लागले. राजेश खन्ना, अमिताभ बच्चन, जितेंद्र यांची फोटो सेशन एकिकडे तर आशा सचदेव, कोमिला विर्क, के. टी. मिर्झा, रिंकू जैस्वाल, शीतल, श्यामली, प्रेमा नारायण (या नावाच्या अभिनेत्री होत्या. बरं का? त्यांनी पिक्चरच्या शूटिंगपेक्षा फोटो सेशनमध्ये विशेष रस घेतला) यांची धाडसी फोटो सेशन दुसरीकडे अशी फोटो सेशनची धमाल उडाली. वर्षा उसगावकर, अश्विनी भावे, किशोरी शहाणे या मराठीतून हिंदीत गेल्या तेच त्यांचे पाऊल आकर्षक फोटो सेशनचे पडले. आणि इंग्लिश मिडियातून झक्कास कव्हरेज मिळवले.


फोटो स्टुडिओतील असे सेशन मग स्पॉट फोटो सेशनकडे वळले. यासह चित्रपटाच्या
















सेटवरची फोटो संस्कृती छान रुजली होतीच. मुहूर्त दृश्य होताच धडाधड फ्लॅश उडण्यात वेगळाच स्पेल असे. मोठ्या चित्रपटाचा मुहूर्त होताच तोच मूड फोटोत येई/ तसे. राजेश खन्ना निर्मित व अभिनित आणि कमाल अमरोही दिग्दर्शित बहुचर्चित आणि बहुखर्चिक अशा मेहबूब स्टुडिओतील 'मजनून 'च्या मुहूर्ताला रेकॉर्ड ब्रेक फ्लॅश उडाले. राजेश खन्ना व राखी यांच्यावर मेणबत्तीच्या भल्या मोठ्या सेटवर उर्दूतील संवादाचे दृश्य रंगले आणि तमाम फोटोग्राफर्सनी हा क्षण टिपला. पण हा महत्वाकांक्षी चित्रपट असा फक्त आणि फक्त फोटोत राहिला. असं अनेक चित्रपटांचे ग्लॅमरस मुहूर्त फोटोत राहिलेत. दिलीपकुमार दिग्दर्शित 'कलिंगा', शेखर कपूर दिग्दर्शित 'टाईम मशीन ', सुभाष घई दिग्दर्शित 'देवा', एन. चंद्रा दिग्दर्शित 'कुशांत ' असे अनेक भारी भारी चित्रपट फोटोंमुळे आजही 'लाईव्ह ' आहेत. ते चित्रपट पडद्यावर आले नाहीत. पण या मुहूर्ताच्या फोटोत कायम आहेत.

व्हीडिओच्या युगाने 'फोटो सेशन 'चे कव्हरेज असा फंडा आणला. फोटोतला 'रंग' त्यात उतरलाच नाही तर 'दिसणार' कसा? ही कॉन्सेप्ट रुजली नाही. आपण फोटोसाठी कसे तय्यार होतो हे एक्पोज होऊ नये याची सेलिब्रिटीजना काळजी. फोटोग्राफरचा कॅमेरा आणि व्हिडिओग्राफरचा कॅमेरा यातील फरक लक्षात आल्यानेही तसे झाले असेल.

डिजिटल युगात फोटोवरचे तांत्रिक सोपस्कार फार फार वाढले. मूळ रूपडं आणि टेक्निकल टच यांची ती सांगड दिसू लागली. या प्रवासात एकाच चेहऱ्याची एनर्जी कायम राहिलीय. अर्थात, माधुरी दीक्षितची. तिने हे सगळेच बदल अनुभवलेत. गौतम राजाध्यक्षने तिच्यातील 'मधुबाला' स्पार्क दाखवला. फोटो बोलका असतो म्हणजे काय हे माधुरी दीक्षितचा फोटो पाहताच 'दिसते'. काय भारी तुलना हो. माधुरीचे चाहते प्रचंड खुश.

फोटोग्राफी दिनाच्या निमित्ताने असे अनेक रंग आपोआप समोर येतात. मराठी चित्रपटसृष्टीतील आजची मोकळी ढाकळी पिढी आपल्या फोटोच्या माध्यमातून सतत चमकताहेत. पूजा सावंत, सोनाली कुलकर्णी, श्रृती मराठे, अमृता खानविलकर यांच्या फोटोत एक प्रकारची जिगर दिसतेय. मला चांगलेच दिसायचयं हा तो बाणा आहे. याबाबतही ती 'स्टार'. म्हणूनच तर अनेक नवीन चेहरे मै माधुरी दीक्षित बनना चाहती हू असा जणू हट्ट धरतात.

आज सेलिब्रिटीजच्या फोटो दर्शनसाठी पूर्वीसारखं थांबावे लागत नाही. पूर्वी प्रत्येक साप्ताहिक/ मासिक आपल्याकडचा फोटो एक्स्युझिव्हज हवा याकडे विशेष लक्ष देई. त्यात त्या फोटोग्राफरचाही विशेष टच दिसे. आज अशी स्वतःची ओळख निर्माण करण्यात फोटोग्राफर यशस्वी ठरत नाहीत की सेलिब्रिटीजनी त्यांचे अस्तित्व झाकून टाकलयं तेच समजत नाही. त्यांचा 'डोळा' सेलिब्रिटीजची अनेक रूपे समोर दाखवत असतो. त्याचे क्रेडिट का नाकारावे?

फोटोग्राफी दिवसानिमित्त एक टोचणी सांगायलाच हवी ना? त्यावर 'पडदा' का टाका?

चित्रपटात फोटोग्राफर हीरो अशाही काही गोष्टी. देव आनंद हा आपल्या नायिकांवर कायमच भरभरुन प्रेम करणारा. त्यांच्या सौंदर्याची जी भरके तारीफ करणारा. स्वतःच्या दिग्दर्शनातील 'हीरा पन्ना'मध्ये त्याने मै तस्वीर उतारता हू गात कॅमेर्यातून झीनत अमानचं आकर्षक शरीर सौंदर्याचे दर्शन घडवले. तिनेही त्यासाठी भरपूर सहकार्य केल्याचे दिसले. नायिकांना सहजी आकर्षित करण्यात तो माहिर, त्यात त्याच्या हाती कॅमेरा. सेन्सॉरने उगाच काही कटस सुचवले नाहीत.

आय. व्ही. ससी दिग्दर्शित 'करिश्मा' चित्रपटात कमल हसनने मॉडेल फोटोग्राफर साकारला. त्यात स्वरुप संपतने बिकिनीत दर्शन घडवल्याची केवढी खमंग चर्चा काही विचारु नका. अपर्णा सेन दिग्दर्शित 'परोमा'मधील कोलकात्यात एकत्र कुटुंब पध्दतीत रमलेल्या परोमाची (राखी) ओळख तिच्या मुलाच्या फोटोग्राफर मित्राशी होते. तो परोमातील शालिनता कॅमेर्यात टिपतो. यातून दोघांची ओळख वाढत वाढत जाते. फोटोच्या निमित्ताने ते अधिकाधिक जवळ येतात आणि त्यांच्याकडून कळत नकळतपणे बंधने तुटतात. परोमा भानावर येते आणि हे नाते तुटते.

बी. आर. चोप्रा दिग्दर्शित 'इन्साफ का तराजू'ची नायिका (झीनत अमान) ब्युटीफुल मॉडेल असल्याने तिच्या दिलखुलास दिलधडक फोटो सेशनची चित्रपटात सुरुवातीला रेलचेल आहे...नायकाने पडद्यावरही फोटोग्राफरची भुमिका साकारल्याची ही काही मोजकी उदाहरणे.

फोटोग्राफी दिवसानिमित्त असा बहुस्तरीय फोकसमध्ये एक फोटो खूपच महत्त्वाचा. थिएटरला हाऊसफुल्ल गर्दीचा पडलेला वेढा अशा फोटोंचे चित्रपटसृष्टीच्या चौफेर वाटचालीत महत्वाचे स्थान आहे. पिक्चर हिट होत राहिली, फिल्मी इतिहास नवीन वळण घेत घेत गेला. म्हणूनच हे गर्दीचे फोटो खूप वेगळे नि बोलके. त्याच गर्दीत कधी तुम्हीही होतात की, फोटोग्राफी दिवसात तुमचाही असा सहभाग.

---



# तुम जो मिले...

कोणाच्या जीवनात कोण कधी येणार हे सांगता येत नाही. कुटुंबात, समाजात वावरत असतांना एकमेकांना परस्परपूरक आधार मिळणे आवश्यकच. दोन वा त्यापेक्षा अधिक व्यक्ती एकाच विचाराने प्रेरित होऊन एकजुटीने कार्य करीत असतात. सर्वांचे विचार एकमत घेऊन पुढे गेल्यास निश्चितच बदल होतो.

बालपणी आईच्या पदरात असतांना भीती नावाची वस्तू राहत नाही. निस्वार्थ भावनेने काळजी घेणारी माता म्हणजे आई. चालायला, बोलायला, संस्कार देण्यासाठी जीवन व्यतीत करणारे वडील सुद्धा महत्वपूर्ण असते. जन्मदात्यांच्या सानिध्यात असतांना आजी-आजोबा, काका-काकू, मावशी मामा व इतर नात्यांशी मेळ जुळत असतोच. शाळकरी, कॉलेजात शिकत असतांना मित्रांच्या मांदियाळीत मौजमजा चालत असते. कधी तर इतके मित्र-मैत्रिणीमध्ये नाते घट्ट होत जाते की, त्यांच्याविना जगणे असह्य होऊन जाते आणि त्यानंतर वयात आल्यानंतर समाजमान्य विवाह केल्यावर आपली काळजी घेण्यासाठी हक्काचा व्यक्ती मिळत असतो. जीवनात विवाह हा संस्कार असून दोन जीव एकमेळ होऊन संसार चालवीत असतात. असं असतांनासुद्धा मित्र हा खरा मार्गदर्शक, दाता असतो. आपल्या जीवनात घडणाऱ्या बाबींचे यथार्थ वर्णन करण्यासाठी गरजेचा असतो.

मैत्री वा प्रेम एखाद्यावर जाणून केल्या जात नाही. एकमेकांचे विचार समपातळीवर चालत असल्याने एकत्र विचारांची देवाणघेवाण करीत असतात. केवळ बाह्य निरीक्षण करून मैत्रीच्या वा प्रेमाच्या जाळ्यात ओढतांना ओढाताण नक्की होतो. आकर्षणामुळे एखादी व्यक्ती आपल्या मनाला हवीहवीशी वाटत असते. आपल्या समोर असणाऱ्या व्यक्तीच्या मनाचा आवाका न बघता विचारमंथन करणे म्हणजे एकतर्फी असतो. एकतर्फी प्रेमातून हिंसा, बलात्कार वा हल्ले होण्याची शक्यता नाकारता येत नाही. लैंगिक शिक्षणाच्या अज्ञानामुळे वा स्त्रीला दुय्यम स्थान दिल्याने बळजबरी केल्या जाते. मनात असलेली शारीरिक वासना स्वस्थ बसू देत नाही. प्रेम म्हणजे त्यागाचा एक उत्कृष्ठ नमुना आहे. समाजात घडत असलेल्या विघातक घटनेला आळा घालायचा असल्यास संविधानातील 'स्त्री-पुरुष समानता' हे मूल्य अंगिकारायला हवेच. तरुणाई सध्या व्हॉट्सअ‍ॅप, फेसबुकच्या युनिव्हर्सिटीमध्ये जास्त व्यस्त असल्याने क्रियाशीलता कमी होत आहे. कामुक भावनेचे व्हिडीओ बघून वासना अधिक निर्माण होते. हिंगणघाट, हाथरस येथील घटना तसेच मणिपूर मधील दोन विवस्त्र महिलेची काढलेली धिंड समाजाला काळिमा फासणारी घटना आहे. आपल्या जीवनात येणारी व्यक्ती त्रास देणारी नको तर याउलट 'तुम क्या मिले...' म्हणजे तुम्ही मिळाल्यावर जीवनात आशावादी चित्र निर्माण झाले पाहिजे असे मनोमन वाटायला हवे.

'तरुणाई' ही देशाला लाभलेली देणगी आहे. आजचे तरुण उद्याची भावी पिढी आहे. तरुणाई व्यसनाच्या आहारी गेली तर राष्ट्राला घातकच आहे. प्रेमात भरकटत आहे. केवळ वासनेच्या आहारी जाऊन जिंदगीची धूळधाण करत आहे. आई-वडिलांच्या स्वप्नाला मूठमाती देत प्रेमामध्ये आंधळे होत आहे. love is a part of life but not a whole life असं असतांना सुद्धा प्रेमात पडून आपली जीवनयात्रा संपविण्याच्या घटना घडत आहे. प्रेमात असतांना गैरसमज पसरविणारे आपलेच असतात. गैरसमज निर्माण होऊन दोघांत तेढ आणखी वाढत जाते. प्रेमात असलेल्या व्यक्ती सोबतीने जीवन जगण्याचा अट्टाहास.. त्यानंतर त्यांच्यात येणाऱ्या वितुष्ट, वेदना, विरह असह्य होत असल्याने जीवनाची सांगता करून जोडीने निरोप घेत आहे. या गोष्टी आजच्या तरुणाईला भूषणावह नाही. म्हणून अगोदर शिक्षणाला महत्त्व देण्यात यावे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' हा संदेश तरुणाईने घ्यायला हवा. 'लगेगी नोकरी तो मिलेगी छोकरी' हा आशावाद मनी बाळगला पाहिजे.

कॉलेजचे दिवस तसे रंगीनच असतात. एकमेकांच्या आवडीनुसार वागणे, आपल्या आवडत्या व्यक्तीच्या शब्दाला प्रमाण मानणे, फिरायला जाणे, सहलीला जाणे, कॅफेत जाणे इत्यादी अनेक गोष्टीचे आकर्षण असते. आवडीने सहवासात राहून मैत्रीचे रोपटे कधी प्रेमाच्या उंबरठ्यावर येऊन ठेपते कळतच नाही. प्रेमात इतके गढून जातात की, दुसरं काहीही दिसत नाही. पुढच्या व्यक्तीचा चेहरा नि आठवणी ह्याच मनात साठवून ठेऊन वागत असतात. उठता-बसता त्यांच्याच आठवणी मनात घर करीत असतात. चित्रपत्रात बघितल्याप्रमाणे वास्तवात आपण तसेच जगण्याच्या आणाभाका घेत असतात. तुम्ही जेव्हापासून माझ्या जीवनात आलेत तेव्हापासून जीवन जगण्याचा आनंद गगनात मावेनासा होऊन गेला याची कोमल झुळूक ओठावर स्मित हास्य करवून जाते. प्रेमी युगलांच्या मुखातून मग तुम क्या मिले जाने जा..प्यार जिंदगी से हो गया.. असे शब्द तरळत राहते. प्रेमी युगल ज्याप्रमाणे तना-मनाने एकत्र आलेले असते त्याचप्रमाणे त्यांच्या वलयाभोवती असलेले नात्यांची वीण घट्ट व्हायला हवी तेव्हाच नात्यातील माणसे देखील तुमच्याकडे बघितल्यावर म्हणायला हवे ना!! की तुम क्या मिले..सबका दिलं खुले... एखादा व्यक्ती तुमच्या जीवनात आल्यावर तुमच्यात झालेला बदल,जीवनाशी समरस होण्याची संधी हीच खरी जगण्याची नांदी आहे हे मनात यायला हवे. जेव्हा-जेव्हा आठवणींचे काहूर मनात येतात तेव्हा तुम जो मिले..तो मन आनंदात डोले असा खराखुरा भास व्हायला हवा आणि जिंदगी जगण्याची ओढ निर्माण झाली पाहिजे क्योकी तुम जो मिले...

**-दुशांत निमकर**

---

## ...म्हणून साजरा केला जातो
# जागतिक डास दिन



आज २० ऑगस्ट २०२३. दरवर्षी २० ऑगस्ट हा दिवस जागतिक डास दिन अर्थात वर्ल्ड मॉस्किटो डे म्हणून साजरा केला जातो. डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी जनजागृती करण्यासाठी जागतिक डास दिन साजरा केला जातो.

एक मच्छर आदमी को... बना देता है...हा क्रांतिवीर सिनेमातील नाना पाटेकर यांचा संवाद अतिशय प्रसिद्ध आहे. हाच डास अथवा मच्छर अनेक रोगांचा वाहक ठरलेला आहे. आजच्या घटकेला, माणसाच्या आरोग्याचा खरा शत्रू 'डास'च आहे. झिका, मलेरिया, डेंगी, हत्तीपायासारख्या आजारांचा वाहक असलेल्या डासांचे समूळ उच्चाटन शक्य नाही. मात्र, डासांपासून निर्माण होणाऱ्या रोगांचा सामना करण्यासाठी कोट्यवधी रुपयांची औषधे आणि आरोग्यविषयक उपकरणांची बाजारपेठ निर्माण झाली आहे.

डॉ. रोनल्ड रॉस यांनी संक्रमित झालेली मादा डास चावल्यामुळे हिवताप होतो, याचा शोध लावला. हे निमित्त साधून त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ २० ऑगस्टला जागतिक डास दिवस साजरा करण्यात येतो. डासांपासून मलेरिया होतो, ही माहिती पुढे आल्यानंतर डासांपासून बचावाचे घरघुती उपाय सुरू झाले. शास्त्रीय संशोधनातून डास पळविण्यासाठी अगरबत्ती, मच्छरदाणी, डास प्रतिबंधक औषधांमध्ये कॉइल, लिक्विड, मलम यांचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू झाला. कोट्यावधीची बाजारपेठ निर्माण होण्यास डास निमित्त ठरले. डासांमुळे डेंगी, हिवताप, चिकनगुन्या, झिका, हत्तीपाय यासारख्या आजाराला सामोरे जावे लागते. डासांच्या हजारो प्रजाती असल्या तरी ॲनॉफेलीस, क्युलेक्स आणि ईडिस या प्रजाती रोगांचा प्रसार करतात. दरवर्षी एकूण लोकसंख्येच्या २० टक्के लोकांना हिवताप, डेंगीसह इतर किटकजन्य आजाराचा धोका आहे. पूर्वी केवळ नागपूर विभागात दरवर्षी २५ लाख व्यक्तींच्या रक्ताची तपासणी होत असे. कुंडी, फ्रिज, एसीमागील ट्रे, पिंप व छतावरील पाणी, नारळ कवट्या आणि भंगार साहित्यात डासांची उत्पत्ती होते.

**डासांच्या जाती आणि होणारे रोग**

एडिस इजिप्ती - झिका, येलो फिवर, डेंगी. दिवसा चावतात.

ॲनॉफेलिस - हिवताप होतो. रात्री चावतात

क्युलेक्स-हत्तीपाय, अंडाशय वाढणे. चिखलात चावतात.

**इतिहास**

१८९७ मध्ये सर रोनाल्ड रॉसच्या 'अनोफिलीस डास मलेरियाचे परजीवी मानवांमध्ये संक्रमित करतात' या शोधाची आठवण म्हणून दरवर्षी २० ऑगस्ट रोजी जागतिक मच्छर दिन साजरा केला जातो. लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिन १९३०च्या दशकापासून ब्रिटीश डॉक्टरांच्या कार्याला सलाम करण्यासाठी वार्षिक कार्यक्रमाचे आयोजन करत आहे. आकाराने अगदी लहान असले तरी, डास हे कदाचित एकमेव शिकारी आहेत जे शतकानुशतके भरभराटीला आले आहेत. खर तर, हे जगातील सर्वात घातक कीटक म्हणून गणले जातात. दरवर्षी सात लाखांहून अधिक लोकांचा बळी मच्छरामुळे होणाऱ्या आजरामुळे होतो.

**महत्त्व**

मलेरियामुळे होणाऱ्या आजारांशी लढा देण्यासाठी आरोग्य अधिकारी, स्वयंसेवी संस्था आणि इतरांच्या प्रयत्नांना ठळक करण्यासाठी दरवर्षी जागतिक मच्छर दिन साजरा करण्याचे दुसरे मोठे आणि महत्त्वाचे कारण आहे. दरवर्षी जागतिक मच्छर दिनानिमित्त डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी जनजागृती केली जाते.

डासांमुळे होणाऱ्या आजारांपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी घर आणि भोवतालचा परिसर स्वच्छ ठेवणे आवश्यक आहे. कचरा साठणार नाही, कुठेही पाणी साठणार नाही तसेच एखाद्या कामासाठी पाणी साठवले असल्यास ते व्यवस्थित झाकून ठेवले आणि त्यात डासांची पैदास होणार नाही याची खबरदारी घेतली तर डासांमुळे होणारे अनेक आजार टाळणे शक्य असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. जलस्त्रोतांच्या ठिकाणी डासांची पैदास होऊ नये म्हणून वेळोवेळी हे पाणी स्वच्छ करावे तसेच त्या पाण्यात मर्यादीत गप्पी मासे सोडावे, असेही सल्ले तज्ज्ञ देतात.

आजही जगात डासांमुळे होणाऱ्या आजारांनी मृत्यू होण्याचे प्रमाण लक्षणीय आहे. विशेष म्हणजे जगातील घातक प्राण्यांविषयी केलेल्या एका सर्वेक्षणात आजारांमुळे डासांविषयी लोकांच्या मनात प्रचंड भीती असल्याचे स्पष्ट दिसून आले. याच कारणामुळे दरवर्षी जागतिक डास दिन साजरा केला जातो. या दिवशी डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी जनजागृती केली जाते.

दरवर्षी वेगवेगळ्या संकल्पना घेऊन जागतिक डास दिन साजरा करतात. ब्रिटनच्या रोनाल्ड रॉस यांनी मादी एनोफिलिस डास आणि मलेरिया यांच्यातील संबंध शोधला होता. या संदर्भातले संशोधन त्यांनी १९८७ मध्ये जाहीर केले होते. यानंतर अनेकांनी डासांबाबत अनेक प्रकारचे संशोधन केले.

उपलब्ध आकडेवारीनुसार दरवर्षी चार लाख ३५ हजारांपेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू मलेरिया या आजारामुळे होतो. जगात दरवर्षी दोन अब्जांपेक्षा जास्त नागरिकांना मलेरियाचे बाधा होते. भारतातही दरवर्षी डेंग्यू, मलेरिया या डासांमुळे आजारांनी अनेकांची तब्येत बिघडते. यामुळेच डासांमुळे होणाऱ्या आजारांविषयी जनजागृती करण्यासाठी साजऱ्या केल्या जाणाऱ्या जागतिक डास दिनाला प्रचंड महत्त्व आले आहे.

**असा करा बचाव**

योग्य कपडे निवडा - पूर्ण बाहीचे, सैल कपडे परिधान केल्याने डासांच्या चाव्यापासून बचाव होऊ शकतो.

**स्प्रे वापरा**

डास चावण्यापासून वाचण्यासाठी आपण घरी कीटक स्प्रे वापरू शकता. कोणतेही हानिकारक परिणाम टाळण्यासाठी पॅकवर नमूद केलेल्या मार्गदर्शक सूचनांचा आवश्य वाचा आणि त्यांचे पालन करा.

**डासांना नैसर्गिकरित्या दूर करण्यासाठी**

लिंबू बाम, तुळस, लॅव्हेंडर आणि रोझमेरी सारख्या डास-प्रतिबंधक वनस्पती वापरून पहा. मिंट, लेमनग्रास, तुळस आणि निलगिरी ही काही आवश्यक तेल आहेत जी तुम्ही वापरू शकता.

**परिसर स्वच्छ ठेवा**

तुमच्या बागेत किंवा तुमच्या जवळच्या ठिकाणी पाणी साठू होऊ देऊ नका. आपण पाण्याचे वर्गीकरण देखील टाळावे. अस्वच्छ पाणी साठू नये म्हणून कंटेनर, भांडी, बादल्या आणि इतर कंटेनर उलटे ठेवा. तसेच, गरज नसताना खिडक्या आणि दरवाजे बंद ठेवा.

**लक्षणांकडे लक्ष द्या**

डासांमुळे होणारे आजार पावसाळ्यात सामान्य असतात. तुम्हाला डेंग्यू, मलेरिया किंवा चिकनगुनियाची लक्षणे आढळल्यास त्वरित वैद्यकीय मदत घ्या.

यासोबतच खिडक्यांना जाळ्या बसवा, डास प्रतिरोधक मलम लावा, डासांना पळविणारे धूप इत्यादींचा वापर करा, फिकट रंगाचे, लांब बाह्यांचे कपडे घाला, झोपताना मच्छरदाणीचा वापर करावा.

**(साभार : इंटरनेट)**

# चोरांच्या बंदोबस्तासाठी ग्रामसभा

## कर्जत पोलीस ठाण्यातर्फे जनजागृती



**कर्जत : प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांपासून कर्जत शहरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. याबाबत अनेक तक्रारी पोलीस ठाण्यात केल्या गेल्या आहेत. नानामास्तर नगर, गुरू नगर परिसरात चोरट्यांची वर्दळ वाढली असल्याचे सीसीटीव्ही मधून समजून आली. कर्जत पोलीस ठाण्यात मनुष्य बळ कमी असल्याने पोलिसांना चोरट्यांचा बंदोबस्त करण्याच्या मर्यादा आहेत. या पार्श्वभूमीवर कर्जत पोलीस ठाण्याकडून जनजागृती करण्यासाठी सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ग्रामस्थांनी उपस्थिती दर्शवून पोलिसांसोबत सकारात्मक चर्चा केली.

नानामास्तर नगरमधील श्री सिद्धिविनायक मंदिरात सभेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी कर्जत पोलीस ठाण्याचे आर. बी. रसेडे, संतोष साळुंखे, पोलीस पाटील कृष्णा शिंदे, माजी नगरसेवक कृष्णा घाडगे, बाळू तवळे, रामदास ठाकरे, ज्ञानेश्वर भालिवडे, सोमनाथ पालकर, रमेश खैरे, भगवान शिंदे, ज्ञानेश्वर कर्णुक, केतन मोधळे, भीम मुसळे, राजाराम गायकवाड, मनोहर ढोले, जयदीप शिंदे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.

या वेळी रसेडे यांनी, पोलीस कर्मचारी कमी असल्याने थोडी अडचण होते. चोरांचा बंदोबस्त करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन केले. त्यावर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा प्रस्ताव पुढे आला, मात्र त्यासाठी वेळ लागणार असल्याने नागरिकांनी गस्त घालावी, असे सूचित करण्यात आले. गस्त घालणाऱ्या नागरिकांना ओळखपत्र देण्यात यावीत, असेही सांगण्यात आले. पोलिसांच्या मनात आल्यास ते चोर पकडू शकतात. त्यांना चोर कोण आहेत ते माहीत असत, असे माजी नगरसेवक घाडगे यांनी सांगितले. त्यावर रसेडे यांनी 'सराईत चोरांची यादी आमच्याकडे असते मात्र आता नव्याने चोरांच्या टोळ्या झाल्याने त्यांची नावे पोलिसांकडे नाहीत.' असे स्पष्ट केले.

'गस्त घालताना कोणती शस्त्रे आम्ही बरोबर ठेऊ शकतो?' या प्रश्नावर 'कोणतेही हत्यार ठेऊ नका व कायदा हातात घेऊ नका. असे पोलिसांकडून सांगण्यात आले. यानंतर विभागवार गस्त घालणाऱ्यांची नावे द्यावीत, असे सूचित करण्यात आले. 'कधी फक्त ज्येष्ठ नागरिक, कधी एकटी महिला तर कधी फक्त लहान मुलेच घरी असतात त्यामुळे दिवसासुद्धा लक्ष ठेवण्याची आवश्यकता आहे.' हे महिलांनी निदर्शनास आणून दिले.

# रोह्यात सुमारे ११ लाखांचा गुटखा जप्त

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यात वरसे फाटा येथे पहाटेच्या सुमारास डिझायर एक्सव्हीआय या गाडीतून विमल गुटखा विक्रीला येत असल्याची माहिती मिळतात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग रायगडच्यावतीने छापा टाकत तीन आरोपींकडून एकूण १० लाख ८३ हजारांचा ८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

रोहा शहराचा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात गुटखा विक्री होत होती रोहा शहरासह ग्रामीण भागातील गुटखा बंद करण्याची मागणी नागरिकांची होती. रोहा तालुक्यातील वरसे फाटा येथे १९ ऑगस्ट रोजी पहाटे डिझायर व्ही एक्स आय गाडीतुन विमल पान मसाला व विमल तंबाखू गुटखा विक्रीला आणला होता. हा गुटखा वाहतुक करीत असताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा अलिबाग रायगडच्यावतीने जप्त करण्यात आला आहे.

पोलिसांनी जप्त केलेल्या मुद्देमालात १ लाख ८७ हजाराचा केशर युक्त पान मसाला, ८७ हजार १२० रुपये विमल पान मसाला, ९६८० व्ही १ तंबाखू, आठ लाख किमतीचा डिझायर व्ही एक्स आय गाडी असे एकुण १० लाख ८३ हजारांचा ८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे.

रोहा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आले आहे. यासंबधीत अधिक तपास पोलीस श्री. वायंगणकर करीत आहेत.


## जाहीर हरकत नोटीस

तमाम जनतेस आमचे अशिलांतर्फे जाहीर हरकत नोटीस देण्यात येते की, मौजे – नानोशी ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली जमिन मिळकत आमचे अशिलांनी कायम खरेदी करण्याबाबत आवश्यक ते करारनामे केले असुन संबंधित जमिन मालकांना ठरल्या प्रमाणे मोबदला दिलेला आहे. सदर जमिन विकी परवानगीसाठी प्रकरण शासनाकडे सादर केले आहे. असे असताना काही तथाकथीत दलाल मुळ जमिन मालकांचा गैर समज करुन व त्यांना जादा मोबदल्याचा अमिष दाखवुन सदर जमिन मिळकतीचा व्यवहार काही त्रयस्थ खरेदीदारांबरोबर करीत असल्याचे आमचे अशिलांना समजले आहे सदर जमिन मिळकतीचा असा कोणताही खरेदी विक्रीचा व्यवहार कोणीही केल्यास त्यास आमचे अशिलांची तिव्र हरकत राहील. तसेच असा केलेला कोणताही व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. तसेच आमचे अशिलांचे कोणतेही कायदेशीर हक्क व अधिकारास बाधा येणार नाही. सदर जमिन खरेदीचा आमचे अशिलांचा कायदेशीर अधिकार काहीही झाले तरी अबाधित राहील याची सर्वांनी समज घ्यावी. याउपर कोणी व्यवहार केल्यास त्यामुळे होणा–या सर्व नुकसानीस असा तथाकथीत खरेदीदार व दलाल जबाबदार राहुन आमचे अशिलांचे होणारे आर्थीक नुकसान भरून देण्यास बांधील राहतील. तसेच व्यवहारा बाबत योग्य तो दिवाणी व फौजदारी खटला दाखल करण्यास आमचे अशिल मागे पुढे पाहणार नाहीत याची ही समज सर्वानी घ्यावी. तरी असा कोणताही प्रयत्न कोणी करु नये व करीत असल्यास तो ताबडतोब थांबवावा असे आमचे अशिलांतर्फे जाहीर करीत आहोत.

**जमिनीचे वर्णन**

**मौजे नानोशी ता. पनवेल जि. रायगड**

| अ.न. | स.नं. | हिस्सा नं. | क्षेत्र | जमिन धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | १८ | ० | ३–५८–० | महादू काळया पारधी<br>श्रावण हापडया पारधी<br>बुध्या पदया पारधी<br>कमळया रामा पारधी<br>आंब्या तुकाराम पारधी<br>शंकर जेठया पारधी<br>बाळया नामा ठाकरे<br>रामचंद्र श्रावण पारधी |
| २ | २० | ० | ९– ८१– ० | महादू काळया पारधी<br>श्रावण हापडया पारधी<br>बुध्या पदया पारधी<br>कमळया रामा पारधी<br>आंब्या तुकाराम पारधी<br>शंकर जेठया पारधी<br>बाळया नामा ठाकरे<br>रामचंद्र श्रावण पारधी |
| ३ | ३५ | – | ७–८५–० | महादू काळया पारधी<br>श्रावण हापडया पारधी<br>बुध्या पदया पारधी<br>कमळया रामा पारधी<br>आंब्या तुकाराम पारधी<br>शंकर जेठया पारधी<br>बाळया नामा ठाकरे<br>रामचंद्र श्रावण पारधी |
| ४ | ३६ | ० | ८–२५–० | महादू काळया पारधी<br>श्रावण हापडया पारधी<br>बुध्या पदया पारधी<br>कमळया रामा पारधी<br>आंब्या तुकाराम पारधी<br>शंकर जेठया पारधी<br>बाळया नामा ठाकरे<br>रामचंद्र श्रावण पारधी |

**ठिकाण :– पनवेल**
**दिनांक :– १९/०८/२०२३**

शिक्का

**सही/–**
**ॲड. अरुण कुमार**
**सिबीडी– बेलापूर**


# माणगावमध्ये महारोजगार मेळावा उत्साहात

## शेवटच्या घटकांपर्यंत रोजगार पोहचणे हाच उद्देश –मंत्री आदिती तटकरे






**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात शासन आपल्या दारी योजनेचे काम चांगल्या पद्धतीने सुरू आहे. महारोजगार कार्यक्रमाच्या माध्यमातून शेवटच्या घटकांपर्यंत पोहचणे हाच रोजगार मेळाव्याचा मुख्य उद्देश असल्याचे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी माणगाव येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता विभाग महाराष्ट्र शासन आपल्या दारी या उपक्रमांतर्गत जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र अलिबाग–रायगड व ग्रामीण प्रगती फाउंडेशन माणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने बेरोजगार महिलांसाठी विशेष पंडित दिनदयाळ उपाध्याय महारोजगार मेळाव्याचे आयोजन शनिवारी (दि. १९) निजामपूर रोड येथील गांधी मेमोरियल हॉलमध्ये करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मंत्री आदिती तटकरे उपस्थित होत्या.

मेळाव्यात मार्गदर्शन करताना मंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, या मेळाव्यासाठी रायगड जिल्ह्यातून ६०० बेरोजगार महिलांनी ऑनलाईन प्रतिसाद दिला होता. माणगाव तालुक्यातून व जवळच्या गावांतून २५० ते ३०० महिला उपस्थित आहेत. काही महिलांना या मेळाव्यासाठी येण्याकरिता जमले नसेल त्या महिलांना त्यांच्या जवळपासच्या तालुक्यात ज्या वेळी आपल्या उद्योजकता व विकास केंद्रामार्फत महारोजगार मेळावा होईल त्या वेळी त्यांना जरूर बोलवा. त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारने पाऊल उचलले आहे असे सांगत मेळाव्याला शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात बोलताना कौशल्य आणि रोजगार सहाय्यक आयुक्त अमिता पवार म्हणाल्या की, या मेळाव्याचा मुख्य उद्देश म्हणजे स्थानिक व आसपासच्या कंपन्यांना बोलावून त्यांच्यामार्फत बेरोजगार महिलांना मार्गदर्शन करून जे पद ज्या ज्या कंपन्यांमध्ये रिक्त असेल ते भरण्यासाठी बेरोजगार महिलांची मुलाखत घेऊन त्यांच्या गुणवत्तेनुसार निवड केली जाते. शिवाय रोजगाराबरोबरच स्वयंरोजगारही देणार आहोत. यासाठी कर्ज प्रकरणे कशी आहेत याची माहिती घेऊन या कर्जाचा लाभ आपल्याला स्वयंरोजगारासाठी घेता येईल.

या कार्यक्रमास माणगावचे उपविभागीय अधिकारी संदीपान सानप, ग्रामीण प्रगती फाउंडेशनचे मंगेश डफळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शेखर देशमुख, प्रदेश प्रवक्त्या ॲड. सायली दळवी, माणगाव तालुका अध्यक्ष सुभाष केकाणे, महिला राष्ट्रवादीच्या तालुकाध्यक्ष संगीता बक्कम, युवक प्रदेश सचिव दीपकजाधव, भाजपच्या मानवाधिकार महाराष्ट्र राज्य सेक्रेटरी यशोधरा गोडबोले, प्राजक्ता शुक्ला, ज्येष्ठ नेते काका नवगणे, माजी सभापती प्रकाश लाड, माजी नगराध्यक्ष योगिता चव्हाण, माजी पंचायत समिती सदस्य शैलेश भोनकर, भाजप महिला मोर्चा तालुका अध्यक्ष अश्विनी महाडिक, उणेगाव माजी सरपंच राजेंद्र शिर्के, श्रद्धा यादव, देविका पाबेकर, माजी उपनगराध्यक्ष रत्नाकर उभारे, संदीप खरंगटे, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष नितीन वाढवळ, सचिन देसाई, साहिल गायकवाड, सुमित काळे, सौरभ खैरे, संतोष यादव, नगरसेवक बाबुराव निंबाळकर, नगरसेविका रिया उभारे, सुविधा खैरे, हर्षदा काळे, लक्ष्मी हिलम, माजी नगरसेवक हेमंत शेट, शासकीय व निमशासकीय कार्यालयाचे अधिकारी, कर्मचारी, विविध संस्था, महामंडळाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या मेळाव्यात सहभागी झालेल्या संस्था व महामंडळे यांच्या प्रतिनिधींचा मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मेळाव्याचे सूत्रसंचालन उणेगाव ग्रामपंचायतीचे सरपंच राजेंद्र शिर्के व सायली सुभाणे यांनी केले.

# देगाव येथे अमृत महोत्सव

**माणगाव :** तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत देगांव हद्दीतील नागरिकांचा अमृत महोत्सवासाठी अप्रतिम प्रतिसाद लाभला.

स्वातंत्र्य दिनाचा अमृतमहोत्सव १३ ते १५ ऑगस्ट असे तीन दिवस मोठ्या उत्साहाने शासकीय आदेश पाळून प्रत्येक गावकऱ्यांनी एकत्रित येत साजरा केला. या अमृतमहोत्सवी स्वातंत्र्य दिनाच्या निमित्त ग्रामपंचायत हद्दीतील विविध कार्यक्रमांना हद्दीतील ग्रामस्थांनी चांगले सहकार्य केल्याचे ग्रामपंचायतीच्या सरपंच सुषमा नितीन वाघमारे यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले. त्याचप्रमाणे ग्रामपंचायत हद्दीमध्ये रिले येथे पंचप्राण शपथविधीसाठी महिलांनी अप्रतिम असे कार्यक्रम केले.

याचप्रमाणे देगाव ग्रामपंचायत हद्दीतीलसेवानिवृत्त माजी सैनिक यांचाही या अमृतमहोत्सवानिमित्त शाल, श्रीफळ तसेच सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व मराठी शाळेमध्ये विविध कार्यक्रम करून स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण मोठ्या उत्साहाने करण्यात आले. या स्वातंत्र्य दिनानिमित्त मंगळवारी (दि. १५) ग्रामपंचायत हद्दीतील विविध शाळांमध्ये लहान मुलांचे विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम उत्साहात झाले.

# माजगाव आंबिवली येथे विविध रोपांची लागवड



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टकडून कोकण एज्युकेशन सोसायटी माध्यमिक विद्यालय माजगाव आंबिवली येथे शनिवारी (दि. १९) वृक्षारोपण कार्यक्रम झाला.त्यावेळी आंबा, वड, पिंपळ, उंबर, जांभूळ, आपटा, चिंच, बदाम, कडुलिंब असे १०० वृक्षाची लागवड करण्यात आली.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून संजीव भनोत मुख्य व्यवस्थापक पतंजली रुची सोया, जयवंत पाटील उपसभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, रवींद्र पाटील सामजिक कार्यकर्ते नरेश पाटील, रवींद्र दिवाणे, विलास कांबळे, दिपाली पाटील भावी सरपंच माजगाव धनश्री दिवाणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम कांबळे मुख्याध्यापक यांनी केले. या वेळी अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांनी यावर्षी ५००० वृक्षारोपण लागवड संकल्प घेतला असून अजून मोठ्या प्रमाणात कार्यक्रम करण्यात येतील व आपल्या संस्थेमार्फत कोकण एज्युकेशन सोसायटी माध्यमिक विद्यालय माजगाव यांना खेळाचे साहित्य शाळेसाठी भेट म्हणून द्यायचे कबूल केले आहे.

# माडप ठाकूरवाडीतील कुटुंबांची सुरक्षित स्थलांतर करण्याची मागणी

**खोपोली : प्रतिनिधी**

दरडीच्या छायेत राहणाऱ्या तालुक्यातील माडप ठाकूरवाडी कुटुंबांनी तहसीलदार आयुब तांबोळी यांची भेट घेत सुरक्षित ठिकाणी पुनर्वसन करण्याची मागणी केली आहे.

इर्शाळवाडी दुर्घटनेला महिना पूर्ण होत आहे. या दुर्घटनेनंतर तालुक्यातील डोंगर भागात, दुर्गम ठिकाणी राहणाऱ्या अनेक वाडी, पाडे अहवाल तयार करण्यात येत आहे. सावरोली खारपाडा मार्गावर माडप ग्रामपंचायत आहे. याठिकाणी राहणारा ठाकूर समाज हा पिढ्यानपिढ्या डोंगराळ भागात राहत आहे. जवळपास १३०कुटूंब असून ५३०च्या आसपास लोकसंख्या आहे. वस्तीपासून काही अंतरावर डोंगराचा भाग खचण्यास सुरवात झाली आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

इर्शाळवाडीसारखी आपत्ती ओढावू नये यासाठी यशवंत दत्तू वाघ, गणेश महादू होला, सुरेश भाग्या निरगुडे, राम दामा वारे, कामल्या हशा वारे,राम हशा वारे, संदेश तातू शिद ग्रामस्थांनी तहसीलदार आयुब तांबोळी यांची भेट घेत सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करण्याची लेखी मागणी केली आहे.



**दरडीची भीती खाली माडप ठाकूर वाडीतील कुटुंब दिवस ढकलत आहेत. रोजगार, शिक्षणासाठी दररोज पाच ते, सहा किलोमीटर पायपीट करावी लागते. नवीन जागेत स्थलांतर व्हावे, अशी मागणी आहे.**

**–यशवंत वाघ,**
**माडप ठाकूर वाडी**



**पाली : रा. जि. प. शाळा गोमाशी येथे सुधागड तालुका यांच्या वतीने मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. या शैक्षणिक साहित्यामध्ये वह्या, पेन, पेन्सिल, खोड रबर, कंपास पेटी तसेच खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी ग्रामस्थ उपस्थित होते.**

(छाया : धम्मशील सावंत)


MARUTI SADAN CO-OP.HSG SOCIETY LTD

**REDEVELOPMENT TENDER NOTICE[1]**

Sealed Tender are hereby invited from reputed, experienced, financially sound and eligible Builders and Developers with good standing from MARUTI SADAN COOP HSG SOCIETY,Plot No.-43, Sector-10, Khanda Colony, New Panvel ( W )-410206. (Registration No. NBOM/ CIDCO/HSG(OH)JTR/674/1998-99 Dated 5th August 1998) on CIDCO granted lease hold plot. The area of plot admeasuring 2054.095 Sq.mtrs and abutting to 20.00 mtrs wide road on the East, 11.00 mtrs wide road on the West and 12.50 mtrs wide road on the North, for commercial and residential redevelopment The Society has total 36 number of residential flats and 28 number of shops in the building. The blank Tender Documents may be purchased by paying Rs. 5000/- by Cheque in favour of **"MARUTI SADAN CO-OP HSG SOCIETY LTD."** from the society office during 10.00 am to 5.00 pm from **21st August 2023 to 5th September 2023.** The proposal should be submitted in the two sealed envelope in the society office on or before 30th **September 2023 up to 5.00 pm.** The interested Builders/Developers should contact following persons for further information and details if any required.

1. Mr.Suhas Haladkar-Consultant-9820134570
2. Mr. Santosh Pokale-9920242595
3. Mr. Kailash Pawar-8451920995

Date:- 20th Aug. 2023
Place: Khanda Colony. New Panvel (W).

**Chairman/Secretary,**
MARUTI SADAN CO-OP
HSG SOCIETY LTD.,
Khanda Colony-410206.

# स्वच्छतेमध्ये नवी मुंबई क्रियाशील

## अधिकारी, कर्मचाऱ्यांसह स्वच्छताकर्मींचे पालिकेकडून कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेची ओळख स्वच्छ शहर म्हणून देशभरात केली जात असून ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे, तशीच जबाबदारी वाढवणारीही गोष्ट आहे. आता नवी मुंबई हा स्वच्छतेचा ब्रँड झाला असून यामध्ये नवी मुंबई महापालिका अधिकारी, कर्मचाऱ्यांसह आपले स्वच्छताकर्मी, लोकप्रतिनिधी, प्रसारमाध्यमे तसेच उत्साही नागरिक यांचा महत्त्वाचा वाटा असल्याचे नमुंमपा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सांगितले.

त्यांनी महापालिकेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी आपण रहात असलेल्या इमारतीच्या दोन्ही बाजूच्या दोन इमारती आणि आपल्या परिसरातील स्वच्छतेवर काटेकोर लक्ष द्यावे व शहर स्वच्छतेत सक्रिय सहभागी होत स्वच्छतेला योगदान देणारा कर्मचारी व्हावे, अशी नवी संकल्पना मांडली.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त माझी माती माझा देश अभियानात भारतीय स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्ताने महापालिका मुख्यालयातील ॲम्फिथिएटर येथे स्वच्छ सर्वेक्षण २०२३ अंतर्गत आयोजित स्वच्छतेची थ्री आर त्रिसूत्री या विशेष कार्यक्रमामध्ये आयुक्त राजेश नार्वेकर यांनी फेसबुक लाईव्हद्वारे नागरिकांशी थेट संवाद साधला.



या वेळी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ, घनकचरा व्यवस्थापन व आपत्ती व्यवस्थापन विभागाचे विभागप्रमुख उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांच्यासह विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नवी मुंबई महापालिकेचा नावलौकिक येथील अधिकारी, कर्मचारी यांनी उत्तम कामगिरी केल्यामुळे वाढला. चांगले काम केल्यामुळे सगळ्यांच्या अपेक्षाही वाढल्या. त्यामुळे आपली जबाबदारीही वाढली. ही जबाबदारी पेलण्यासाठी आपण सारे सक्षम आहोत याची जाणीव ठेवूनच आयुक्तांनी कर्मचाऱ्यांच्या स्वच्छता कार्याची नोंद त्यांच्या सीआर मध्ये घेतली जाईल अशीही संकल्पना मांडली. याचप्रमाणे स्वच्छता विषयक नवनवीन कामे करताना विविध प्रकारे विचार मंथन केले जाते, मात्र त्याच त्याच मंडळींनी विचार केल्याने त्यामध्ये तोचतोचपणा येण्याचा धोका लक्षात घेत यामध्ये काही नवीन संकल्पना मांडल्या जाव्यात याकरिता महानगरपालिका मुख्यालयातील तळमजल्यावर सूचनापेटी ठेवण्याचे आयुक्तांनी जाहीर केले. या सूचनापेटीत ३० ऑगस्टपर्यंत महानगरपालिका अधिकारी, कर्मचारी यांनी तसेच नागरिकांनीही स्वच्छतेविषयी आपल्या काही नाविन्यपूर्ण संकल्पना मांडाव्यात अशीही एक वेगळी संकल्पना आयुक्तांनी यावेळी अभिव्यक्त केली.

कोणत्याही विधायक कामात उत्साहाने सहभागी होणारे नागरिक हे आपल्या शहराचे बलस्थान असल्याचे प्रामुख्याने नमूद करीत प्रत्येक नागरिकाने आपल्या दिनक्रमातील काही मिनिटे स्वच्छतेसाठी द्यावीत व घरापासूनच ३ प्रकारे कचरा वर्गीकरणासारख्या गोष्टींतून आपल्या स्वच्छतामित्रांवर पडणारा अतिरिक्त कामाचा भार आपल्या परीने हलका करावा असेही आवाहन आयुक्तांनी यावेळी केले.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन करताना घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी आयुक्त महोदयांनी स्वच्छता परीक्षणाविषयी अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करू, असा विश्वास दिला. फेसबुक व यु ट्युब लाईव्हवरूनही अनेक नवी मुंबईकर नागरिकांनी हा कार्यक्रम अनुभवला.

### ‘उपक्रमांविषयी व्याप्ती वाढविणार’

*शहरात कुठेही उभे राहून 'निश्चय केला' असे म्हटले की समोरून 'नंबर पहिला' असा प्रतिसाद मिळेल हे आपल्या नवी मुंबईचे वैशिष्ट्य असल्याचे सांगत आयुक्तांनी 'फिश फेड, ड्राय वेस्ट बँक, झिरो वेस्ट स्लम मॉडेल, मानवतेचे देणे घेणे ही १२ थ्री आर सेंटर्स, थ्री आर ऑन व्हिल्स, रिसायकल मार्ट व रिसायकल बाजार, टर्शिअरी ट्रिटमेंट प्लांट' अशा विविध उपक्रमांविषयी माहिती देत यांची व्याप्ती यापुढील काळात वाढविणार असल्याचे सांगितले.*

### तंबाखूमुक्तीची सामूहिक शपथ

**सदैव स्वच्छ ठेवू आपला देश, माझी माती माझा देश हा संदेश प्रसारित करणारे आरंभ क्रिएशनच्या कलावंतांनी सादर केलेले नृत्यनाट्य उपस्थितांची दाद मिळवून गेले. केंद्र सरकारच्या आदेशानुसार स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत तंबाखूमुक्तीची सामूहिक शपथ यावेळी ग्रहण करण्यात आली.**

# ग्रामपंचायत क्षेत्रातील आपले सेवा केंद्र त्वरित कार्यान्वित करा

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागातल्या ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील बंद असलेली आपले सरकार सेवा केंद्र तत्काळ कार्यान्वित करण्यासाठी नियोजन करावे आणि इतर सर्व योजनांच्या प्रगतीबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दक्ष रहावे. सर्व योजनांना शासनाकडून देण्यात आलेले आर्थिक व भौतिक लक्षांक साध्य करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना कोकण विभागीय महसूल आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिल्या. कोकण भवनातील पहिल्या मजल्यावरील आयुक्त कार्यालयाच्या बैठक कक्षात डॉ. कल्याणकर यांच्या अध्यक्षते खाली कोकण विभागातील जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसाठी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

या बैठकीस ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनुज जिंदल, पालघरचे भानुदास पालवे, रायगडचे भरत बास्टेवाड, रत्नागिरीचे किर्ती पुजार, सिंधुदुर्गचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रजित नायर उपस्थित होते.

### कोकण आयुक्तांच्या सूचना

बैठकीत माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत भूमी, जल, वायु, अग्नी आणि आकाश या थीममध्ये करावयाच्या कामांबाबत आयुक्त डॉ. कल्याणकर यांनी आढावा घेऊन मार्गदर्शन केले. सर्व जिल्ह्यांमार्फत आपल्या कार्यक्षेत्रात माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत जून व जुलै २०२३ दरम्यान केलेली कामे व ऑगस्ट व सप्टेंबर २०२३मध्ये करावयाच्या कामांबाबत सादरीकरण करण्यात आले. घरकुल योजनेअंतर्गत ठाणे जिल्ह्यातील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुलासाठी जमिन उपलब्ध करून देण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी समन्वय साधून कार्यवाही करण्याबाबत सूचित करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाड्या व शाळा यांना भेटी देऊन क्षेत्रिय कामकाजाचा आढावा घेण्याबाबत निर्देश देण्यात आले.



## निवडक

### पाच हजार रोप लागवडीचा निर्धार



**नवी मुंबई :** माझी माती, माझा देश या थीमसह एनएसजी कमांडो मुंबई आणि स्माइल्स फाउंडेशन नवी मुंबई यांनी एक विशेष उपक्रम हाती घेतला, नवी मुंबईत पाच हजार रोपांची लागवड आणि वाटप करण्याचा निर्धार केला आहे. ग्लोबल वॉर्मिंग, मातीची धूप, जंगलतोड यांसारख्या पर्यावरणीय समस्यांचा विचार करून आणि पर्यावरणात निरोगी संतुलन राखण्यासाठी हा उपक्रम हाती घेतला आहे. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून हर घर तिरंगा उपक्रम राबविता आला. यामध्ये तिरंगा ध्वज एनएसजी कमांडो आणि स्माईल फाउंडेशनने ५००हून अधिक आदिवासी कुटुंबे, गावे आणि ग्रामीण शाळांना राष्ट्रीय अखंडतेचे आणि आकांक्षांचे प्रतीक म्हणून झेंडे वितरित केले. या वेळी एनएसजी स्पेशल २६चे कमांडिंग ऑफिसर कर्नल किरपाल सिंग, मेजर बर्वे, धीरज आहुजा, उमा आहुजा, शालिनी विधानी उपस्थित होते.



**आपटा : प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापक मच्छींद्र पाटील यांच्या हस्ते शाळेत झेंडावंदन करण्यात आले. या वेळी ग्रामस्थ व शालेय विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी राष्ट्रीगीत व विविध देशभक्तीपर घोषणा दिल्या, तर त्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)

# वाढत्या प्रदूषणासंदर्भात शिवसेनेतर्फे निवेदन

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा औद्योगिक क्षेत्रामधून सध्या प्रदूषणाचे प्रमाण वाढत असल्याचे आढळले आहे. प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होत असल्याचे वैद्यकीय क्षेत्रात चर्चा आहे. त्यामुळे या वाढत्या प्रदूषणासंदर्भात शिवसेना पनवेल जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी महाराष्ट्र प्रदूषण बोर्डाला दिले निवेदन देत आठवड्याभरात कारवाई करा अन्यथा मोर्चा काढू, असा इशारा देण्यात आला

तळोजा एमाडिसीलगत असलेल्या सर्व परिसरामध्ये वायरल केसेसचे प्रमाण वाढत आहे.



याबाबत महाराष्ट्र प्रदूषण बोर्डाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे यांनी बेलापूर कार्यालयात यासंदर्भात सविस्तर चर्चा केली, तसेच एका आठवड्यात कारवाही करा अन्यथा कंपन्यांवर टाळे बंद मोर्चे काढू असा इशारा विभागीय अधिकारी सतीश पडवळ व तळोजा विभागाचे अधिकारी विक्रांत भालेराव यांना दिला.

निवेदन देतेवेळी शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

# उरणमध्ये विशेष मुलांनी बनविल्या राख्या

**उरण : वार्ताहर**

भाऊ-बहिणीच्या अतूट नात्याचा सन म्हणजे रक्षाबंधन होय. बहिणीची रक्षा करणे ही जबाबदारी भावाची असते. रक्षाबंधन सण ३० ऑगस्ट रोजी आहे. यानिमित्ताने उरण शहरातील उरण नगरपरिषदेच्या स्वतंत्र सैनिक दत्ता रहाळकर मैदान बोरीजवळ असलेल्या स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान संचलित सीबर्ड (स्वीकार) असलेल्या या विशेष मुलांच्या शाळेतील मुलांनी रक्षाबंधन सणासाठी रंगीबेरंगी राख्या बनविल्या आहेत.

राख्यांचे अनेक प्रकार आहेत. गोंडा राखी, खड्यांची राखी, मोत्यांची राखी, असे प्रकार आहेत. तीन रुपयांपासून त २५ रुपयांपर्यंत किमतीच्या राख्या येथे उपलब्ध आहेत. या राख्या युईएस शाळा, सेंटमेरी कॉन्व्हेंट स्कूल उरण, उरण कोकण ज्ञानपीठ महाविद्यालय,



लिटील मास्टर, डॉ. गाडे मॅडम व पालक हे राख्या खरेदी करून मदत करीत आहेत.

उरण नगर परिषदेचे स्वातंत्र्यसैनिक दत्ता रहाळकर मैदानामागे, बोरी येथे राख्या मिळतील. शाळेच्या पर्यवेक्षक माधुरी उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली राकेश म्हात्रे, मानसी पांचाळ,पल्लवी परदेशी, साक्षी दांडेकर, प्रशांत कदम, गणेश जाधव, अस्मिता भोईर आदी शिक्षक मुलांना राख्या बनविण्याचे प्रशिक्षण देत आहेत.

# खारघरमध्ये भाजपतर्फे वीरांना वंदन कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

सालाबादप्रमाणे याही वर्षी भारतीय जनता पक्ष खारघर मंडलातर्फे स्वातंत्र दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भाजप प्रदेशाने व उत्तर रायगड जिल्ह्याने दिलेल्या वीरांना वंदन या कार्यक्रम अंतर्गत खारघर शहरातील माजी सैनिक कर्नल आर के वर्मा, कर्नल अमरजीत बुधवाना, कर्नल शशीधरन, कमांडर जगदीश शर्मा, कमांडर के.के. चव्हाण, कमांडर पुरण चौधरी, गजे सिंग शेरॉन, शिवप्रसाद थपलीयाल या माजी सैनिकांचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम संयोजक गुरुनाथ गायकर यांनी विशेष मेहनत घेतली. या वेळी मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक प्रवीण पाटील, रामजी बेरा, अनिता वासुदेव पाटील, दीपक शिंदे, शुभ पाटील, अनिल खोपडे, प्रभाकर बांगर, संतोष शर्मा, विनोद ठाकूर, वासुदेव पाटील, विपुल चौथालिया, अभिषेक अरोरा, मनोहर नाका अशोक जंगीड, रूपेश चव्हाण, अशोक पवार, प्रदीप शेलार, प्रवीण बेरा, गिरीश गुप्ता, अमित बोधाई, मनोहर नक्का, मनोज भोई, शिवा कसबे, ब्रिजमोहन, शैलेंद्र त्रिपाठी, गंगाधर, किशोर गुल्हाने, दुर्गेश शंखला, महिला मोर्चा अध्यक्षा साधना पवार, मोना अडवाणी, संध्या शारबिद्रे, गीता चौधरी, निर्मला यादव, अंकिता वारंग, नूतन सिंग, सुशीला शर्मा, बिंदिया, शोभा लवटे, कल्पना भोसले, स्मिता आचार्य, प्रिया दळवी, सीमा खडसे, शोभा मिश्रा, स्नेहल बोधाई, नीलम विसपुते, लक्ष्मी माता, मधुमिता जेना, अश्विनी भुवड दुर्गादेवी, नीता बेडेकर इत्यादी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व उपस्थितांचे आभार सरचिटणीस दीपक शिंदे यांनी मानले.




## श्रावणातला घननिळ

श्रावण महिना सुरू होता
सृष्टी सजली सौंदर्याने
पारिजातकाचा सडा बघुनी
हर्षित झाली मनोमनी...

रानामध्ये झरे, ओढे
खळखळ खळखळ वाहू लागले
श्रावणातल्या वातावरणाने
सारे शिवार प्रसन्न झाले...

पाचूच्या त्या वनामध्ये
शिळ घाली घननिळ
आनंदित होऊन वसुंधरा
घननिळसंगे खेळे खेळ...

इंद्रधनूची कमान दिसता
मोर, लांडोर नाचू लागले
बगळ्यांच्या रांगा पाहूनी
गुराखी पावा घुमवू लागले...

मंदस्मित कुसुमांच्या गाली
फुलपाखरांची स्वारी आली
जाता जाता सोबत आपुल्या
मकरंद घेऊन गेली...

वेगवेगळ्या रंगांमधील
पाखरे आकाशात उडाली
स्वच्छंद विहार करूनी
नभांगणाची शोभा वाढवी...

बारा महिन्यांतील श्रावणमास
धरतीवरी करी पखरण
अन् बहरून तृप्त करी
साऱ्यांचे तन-मन...



-धनंजय गोंधळी,
चिरनेर- उरण

# शाहू महाराज विद्यालयात वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वर्धापन दिनानिमित्त नवी मुंबई ‘अंनिस’च्या वतीने नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालयामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.

या वेळी समितीचे राज्य सरचिटणीस विजय परब जिल्हाध्यक्ष अरविंद सोनटक्के, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक निकम प्रधान सचिव प्रा. अमोलकुमार वाघमारे नवी मुंबईतील रबाळे, कोपरखैरणे, घणसोली, सानपाडा, नेरूळ, बेलापूर या शाखेतील पदाधिकारी मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, अविनाश जाधव,प्रदीप कासुर्डे, महेंद्र राऊत, किरण जोशी, जे. डी गवई,किरण वाळुंज, सुगत पनाड, भारती आणारे, सुप्रिया वाघमारे इत्यादी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीमध्ये पिंपळ, चिकू, पेरू या वृक्षांची लागवड करून त्यांचा संगोपन करण्याची जबाबदारी कार्यकर्त्यांनी घेतली.

सध्याच्या परिस्थितीमध्ये अनेक ठिकाणी वृक्षतोड होत आहे पर्यावरणाचा समतोल ढासळत आहे पर्यायाने पर्जन्यवृष्टी कमी होत आहे या अनुषंगाने संघटनेच्या कार्याला ३४ वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने वृक्षारोपण करण्याचे कार्यकर्त्यांच्या बैठकीमध्ये ठरले त्याप्रमाणे नियोजन करून वृक्षारोपण केले. सुरुवातीला स्वागत व प्रस्ताविक अमोल कुमार वाघमारे यांनी केले या बैठकीमध्ये कोल्हापूर व नाशिक या ठिकाणी राज्य कार्यकारणी मध्ये झालेल्या संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा व मनोगत व मागील सभेचे इतिवृत्त वाचन अशोक निकम, प्रदीप कासुर्डे, महेद्र राऊत यांनी केले



### ‘अंनिस’च्या वर्धापन दिनानिमित्त उपक्रम

संघटनेच्या नवी मुंबईतील कार्याचा आढावा जिल्हाध्यक्ष अरविंद सोनटक्के कार्यकर्ते किरण वाळूज, भारती आणारे, सुगात पनाड यांनी सांगितला. या वेळी गजानन जाधव यांनी लैंगिकता प्रबोधन सप्ताहनिमित्त शाहू महाराज विद्यालयामध्ये घेण्यात आलेल्या वयात येताना या कार्यक्रमाचा विशेष उल्लेख करून कार्यक्रमात शाहू महाराज विद्यालय रबाळे येथील बाराशे विद्यार्थ्यांना एकाच दिवशी दोन सत्रांमध्ये ऑडिओ व्हिज्युअल व पीपीटीद्वारे वयात येताना त्याचबरोबर लैंगिकता प्रबोधनाची माहिती प्रा मच्छिंद्र मुंडे व सुशीला मुंडे यांनी दिली व या कार्यक्रमाचं उत्तम नियोजन केल्याबद्दल शाळेतील क्रीडा शिक्षक अमोलकुमार वाघमारे व अविनाश जाधव यांचे विशेष अभिनंदन व कौतुक करण्याचा ठराव या निमित्ताने मांडला त्या सर्वांनी अनुमोदन दिले. संघटनेच्या राज्य कार्यकारणी मधील ठराव नवीन नियमांची माहिती या बैठकीत उपस्थित सर्व कार्यकर्त्यांना केली शेवटी आभार अविनाश जाधव यांनी मानले.

# उरणच्या बाजारात मातीचे नाग दाखल



**उरण : वार्ताहर**

नागपंचमी सोमवारी (दि. २१) असल्याने नागपंचमीच्या दिवशी नागाची पूजा महिला करीत असतात. या दिवशी पारंपारिक मातीच्या नागाची पूजा केली जाते. पूजेसाठी पारंपारिक मातीचे रंगीतपिवळे नाग उरण बाजारपेठेत विकावयास आले आहेत.

रंगीत पिवळे व त्यावर सुंदर, रेखीव टीपके असलेले सुंदर नाग आकर्षित करीत आहेत. मोठे नाग १०० रुपयास एक, मध्यम ५० रुपये, २५ रुपये अशा दराने आम्ही विकतो असे पूजा दीपक मांडेलकर व सुरेखा कुंभार नाग विक्रेते यांनी सांगितले.

निवडक



## वकील संघटनेच्या अध्यक्षपदी सचिन चाळके

**खोपोली** : खालापूर युवा वकील संघटनेची सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. १८) खालापूर न्यायालयातील वकिलांच्या बार रूम येथे झाली. या सभेत युवा वकील संघटनेच्या अध्यक्षपदी अ‍ॅड. सचिन चाळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या सभेस वकील विकास म्हात्रे, उमेश पवार, योगेश मानकवळे, जे.डी. पाटील, तोरणे, जितेंद्र जाधव, राजीव आपटे, रमेश पाटील, रितेश पाटील, मनोज पाटील, सोमनाथ दळवी, मिलिंद सुरावकर, संदीप पवार, जयेश तावडे, आरती गुप्ता, केदारे, भगवान लाले, अजय गौतम, मयूर कांबळे आदी उपस्थित होते.

## पत्रकार संतोष घरटकर यांना पुरस्कार

**महाड** : रायगड जिल्हा संघर्ष पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष व दैनिक रत्नागिरी टाइम्स रायगड आवृत्तीचे महाड कार्यालयीन प्रमुख पत्रकार संतोष घरटकर यांना पुणे येथील ग्रीन वर्ल्ड तसेच कॉसमॉस सहकारी बँक यांच्या संयुक्त विद्यमाने व ए वन ग्रुप यांच्या सहप्रायोजकतेत ग्रीन वर्ल्ड प्राइड ऑफ इंडिया पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. पुणे येथील विद्यार्थीगृहाचे मुक्तांगण इंग्लिश स्कूल या ठिकाणी कार्यक्रम झाला.





**माणगाव : तालुक्यातील वडघर येथील साने गुरुजी राष्ट्रीय स्मारक परिसरात मोर पिसारा फुलवून श्रावणाचे स्वागत करीत आहे. त्याची सलीम शेख यांनी टिपलेली छबी.**

# पावसाअभावी भातपीक धोक्यात

## पोलादपूरच्या कोतवाल बुद्रुकमध्ये शास्त्रज्ञांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कोतवाल बुद्रुक येथे तालुका कृषी अधिकारी सुरज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली रोग व कीड सर्वेक्षण प्रकल्पांतर्गत शेतकरी व शास्त्रज्ञ यांच्यात नुकताच सुसंवाद घडवण्यात आला.

कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र रोग व कीटक शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर यांनी पावसाचा खंड व अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे पिकांमध्ये पिवळसरपणा व ठिपके दिसून करपासदृश्य स्थिती दिसत आहे असे सांगितले. त्यावर सूक्ष्म अन्नद्रव्य फवारणी करण्याबाबत मार्गदर्शन केले.

कोतवाल बुद्रुक येथे श्रीधर विठ्ठल जाधव व हणमंत मारुती पार्टे यांची भातशेती क्रॉपसॅप अंतर्गत पाहणी करताना कृषी विज्ञान केंद्राचे रोग शास्त्रज्ञ डॉ. जीवन आरेकर, कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे, सरपंच रेखा दळवी, उपसरपंच राजेश कदम, ग्रामसेवक करमत, पोलीस पाटील श्रीधर जाधव, माजी उपसरपंच महेश दरेकर, शेतकरी हनुमंत पार्टे, कृषी मित्र गिरीधर दरेकर, रोजगार सेवक संतोष सकपाळ, कृषी सहाय्यक मनोज जाधव आदी उपस्थित होते.



पोलादपूर तालुक्यात महिनाभर मुसळधार पावसाने हजेरी लावली. नंतर भात फुटवा अवस्थेत असताना पावसाचा खंड पडल्याने भातपीक कडा करपत असून पिवळसरपणा वाढला. डॉ. जीवन आरेकर यांनी मूलद्रव्याची व पाण्याची कमतरता असल्याने शेतकऱ्यांनी जमीन भेगाळली असेल व पाऊस नसेल तर जमिनीत खत न टाकता फवारणीतून १९ :१९: १९ हे खत ५ ग्रॅम प्रति लिटर व मायक्रोला ३-४ मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करा, असे उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

कृषी पर्यवेक्षक श्रीरंग मोरे यांनी शेतकऱ्यांना रोग व किड याबाबत मार्गदर्शन करताना कृषीमित्र व रोजगार सेवक यांच्या माध्यमातून कृषी विभागास संपर्क साधावा, असे आवाहन केले.

श्रीधर जाधव व हणमंत पार्टे यांच्या शेतावर रोग प्रतिबंधक फवारणीचे आयोजन करण्यात आले त्या वेळी रोजगार सेवक संतोष सकपाळ यांनी स्वत: फवारणी करून प्रात्यक्षिक दाखवले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषी सहाय्यक मनोज जाधव यांनी, तर आभार कृषी मित्र गिरीधर दरेकर यांनी मानले.

## दोन महिन्यांनंतर पुढील वाटचाल ठरवणार -मंगेश दांडेकर



**मुरुड : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मुरुड तालुका अध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी काही दिवसांपूर्वी आपल्यापदाचा राजीनामा दिला होता. त्यानंतर त्यांनी निवासस्थानी सहकारी व राष्ट्रवादी पक्षाचे समर्थक यांची सभा बोलावली होती. या वेळी दांडेकर यांनी दोन महिने राजकारणापासून अलिप्त राहणार असून माझ्यावर प्रेम करणारे कार्यकर्ते व मित्र यांच्याशी विचारविनिमय करून पुढची वाटचाल ठरवणार असल्याचे जाहीर केले.

या सभेस राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रभारी अध्यक्ष फैरोज घलटे, हसमुख जैन, नितीन पवार, तालुका महिला अध्यक्ष मृणाल खोत, माजी नगरसेविका प्रमिला माळी, विश्वा वर्तक, माजी नगरसेवक संजय गुंजाळ, मुरूड तालुका सुपारी संघाचे चेरमन बाबा दांडेकर, तालुका चिटणीस विजय पैर, योगेंद्र गोयजी, निखिल पाडगे, माजी सरपंच हाफिज कबले, ताबीज धाकम, मुझ्झफर सुर्वे, नरेंद्र हेदुलकर, श्याम कोतवाल, माजी सरपंच प्रभाकर पाटील, सुनील मिसाळ, मंगेश शेट्टी, नयन पाटील, दिनेश बापलेकर, राज पाटील आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीलाच मंगेश दांडेकर यांनी कार्यकर्त्यांना विश्वासात न घेता राजीनामा दिल्ल्याबद्दल दिलगिरी व्यक्त केली. व्यक्तिगत कारणामुळे आपण राजीनामा दिल्याचेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले, परंतु मुरूड शहर व ग्रामीण भागाच्या विकासाबाबत कोणतेही काम असेल तर मी कार्यकर्त्यांसोबत राहणार असल्याचे सांगितले.

या वेळी माजी शिक्षण सभापती नितीन पवार म्हणाले की, मंगेश दांडेकर हे प्रशासनाची माहिती असणारे व लोकांचे प्रश्न मार्गी लावणारे नेते आहेत. मुरूडच्या विकासासाठी त्यांनी पुढाकार घ्यावा. आम्ही त्यांच्या सदैव पाठीशी उभे राहू.

अजित गुरव यांनी बोलताना दांडेकर यांनी मागील १० वर्षे सत्ता नसतानाही कार्यकर्ता जवळ ठेवून पक्ष टिकवला, असे सांगितले. हाफिज कबले, निखिल पाडगे, मनीष माळी, आदेश भोईर, संदेश दांडेकर, मंगेश शेट्टी यांनीही विचार व्यक्त केले.



## आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

**नेरळ : बातमीदार**

कर्जत शहरातील तरुणांनी आमदार महेंद्र थोरवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या वेळी या तरुणांना नियुक्तीपत्र देऊन विविध पदांची जबाबदारी देण्यात आली आहे. ग्रामस्थांच्या मागणीनुसार सामाजिक सभागृहासाठी आमदार विकास निधीतून १५ लाखांची आर्थिक मदतदेखील आमदार थोरवे यांनी जाहीर केली.

या वेळी पंकज पवार, सचिन कानिटकर, नीलेश म्हामुणकर, संदीप शिंदे, विलास जंगम, अरविंद म्हामुणकर, तुषार दळवी, समीर शिंदे, नारायण सुर्वे, नीलेश सुर्वे, किरण पवार, राहुल विश्वासे, रणजित शिंदे, प्रथमेश पवार, स्वप्नील जंगम यांसह अनेक तरुणांनी हा पक्ष प्रवेश केला. पक्ष प्रवेशावेळी पंकज पाटील, नगरसेवक संकेत भासे सोबत अनेक शिवसेना कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत प्रवेशकर्त्या तरुणांवर त्या त्या विभागातील ग्रामस्थांचे प्रश्न जाणून ते सोडवणे म्हणून पक्षाची जबाबदारीदेखील त्यांच्यावर सोपवण्यात आल्याचे पदनियुक्तीपत्र देण्यात आले.

## कोकबन येथे शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्यालयाचे उद्घाटन



**धाटाव : प्रतिनिधी**

सेंद्रीय शेतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ते ओळखून कृषी विभागाने बिजामृत शेतकरी उत्पादक कंपनी सुरू करण्याचा निर्धार केला. त्यातून कंपनीचे कार्य, संधी, त्यावरील विविध उद्योग व सेंद्रीय शेतीचे महत्त्व समजून घेणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन जिल्हा कृषी अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी केले

चणेरा विभागातील कोकबन येथे परंपरागत कृषी विकास योजनातेंर्गत स्थापन करण्यात आलेल्या बिजामृत शेतकरी उत्पादक कंपनीच्या कार्यालयाचे उद्घाटन जिल्हा कृषी अधीक्षक बाणखेले यांच्या हस्ते झाले. त्या वेळी त्या बोलत होत्या.

या कार्यक्रमास प्रकल्प उपसंचालक शिवाजी भांडवलकर, उपविभागीय कृषी अधिकारी अनंत कांबळे, कृषी अधिकारी महादेव करे, अधिकारी अमोल सुतार, बीटीएम परमेश्वर गाडे, व्हिआरटीचे सुशील रुळेकर, रामचंद्र सकपाळ, हेमंत ठाकूर, हरिश्चंद्र वाजंत्री, विठ्ठल मोरे, महेश खांडेकर, अतुल पाटील आदी उपस्थित होते.

अधीक्षक उज्ज्वला बाणखेले यांनी शेतकरी उत्पादक कंपनीचे कार्य, त्यातून संधी, विविध उद्योग व सेंद्रिय शेतीचे महत्त्व या विषयावर सखोल मार्गदर्शन केले. प्रकल्प उपसंचालक शिवाजी भांडवलकर यांनी सेंद्रीय शेती, त्या राबविण्याची कृती व विक्री व्यवस्था आधी विषयांवर मार्गदर्शन केले. उपविभागीय कृषी अधिकारी अनंत कांबळे यांनी सेंद्रिय शेती प्रामाणीकरण, विविध पीक व्यवस्था, बाजार व कंपनी व्यवसाय यावर भाष्य केले. कृषी अधिकारी महादेव करे यांनी सेंद्रीय गट, विविध निविष्ठा निर्मिती, कंपनी व्यवस्थापनातील बारकावे व विक्री व्यवस्था यावर अभ्यासू मार्गदर्शन केले.

कृषी मार्गदर्शन कार्यक्रमाला विभागातील शेकडो शेतकरी उपस्थित होते. उपस्थित कृषी अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवरांचे स्वागत बिजामृत शेतकरी उत्पादक कंपनीचे चेअरमन भारत पाटील यांनी केले.

## वंदे भारत ट्रेनची नवीन आवृत्ती

**रोहे : प्रतिनिधी**

देशात स्वदेशी बनावटीच्या वंदे भारत ट्रेन धावत असून कोकण रेल्वे मार्गावरही मुंबई ते मडगाव अशी या गाडीची सेवा सुरू झाली आहे. आता आयसीएफ चेन्नई येत्या काही वर्षांत वंदे भारत एक्सप्रेसमध्ये नवीन प्रकारच्या गाड्यांसह सुमारे ३० प्रकारांमध्ये ३२४१कोच तयार करण्याची योजना आखत आहे. अधिक प्रगत सुरक्षा आणि तांत्रिक सुधारणेच्या वैशिष्ट्यांसह २५ वंदे भारत ट्रेन प्रगतिपथावर आहेत.

गेल्या वर्षीपासून आयसीएफ चेन्नईने एकूण २७०२ डबे तयार केले आहेत, ज्यात वंदे भारत ट्रेनच्या नवीन आवृत्तीचे १२ डबे आणि रेल्वे बोर्डाने दिलेल्या लक्ष्यानुसार २२६१एलएचबी डब्यांचा समावेश आहे. आयसीएफ चालू वर्षात वंदे मेट्रो नावाच्या वंदे भारत ट्रेनची दुसरी आवृत्ती सुरू करणार आहे.



## खालापुरात ४७ गावांना सनदवाटप

### शासनाच्या तिजोरीत १७ लाखांचा भरणा

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

उपअधीक्षक भूमी अभिलेख खालापूर कार्यालयाच्या सनद चाटप कार्यक्रम खालापूर तालुक्यात ड्रोन सर्व्हे अंतिम टप्यात आले असून ४७ गावांतील शेतकऱ्यांना सनद वाटप करण्यात आली. १७ लाखांची निधी फी स्वरूपात भरणा करण्यात आली आहे.

तहसीलदार आयुब तांबोळी, उपअधीक्षक भूमी अभिलेख शरद काळे, गटविकास अधिकारी कराड व मुख्याधिकारी या वेळी उपस्थित होते. कुंभिवली व उंबरे या ग्रामस्थांना सनद वितरण करण्यात आले.

तालुक्यात १०२ गावाचे ड्रोन सर्व्हे कामकाज पूर्ण झाले. त्यापैकी ८५ गावांचे चौकशी काम पूर्ण झाले आहे. उर्वरित १७ गावांचे कामकाज अंतिम टप्यात आले आहे. तालुक्यात अद्यापपर्यंत ४७ गावांचे सनद वाटप करण्यात आले असून १७ लाखांपेक्षा रक्कमेची सनद फी शासन जमा झाली. साधारण २७१८ इतक्या धारकांनी मालकी हक्क प्रमाणपत्र घेतले आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

राज्य शासनाच्या स्वामित्व योजनेंतर्गत गावठाणमधील रहिवाशांच्या फायद्याची असून शासनाने गावठाण धारकांना खऱ्या अर्थाने मिळकतिची मालक म्हणून सनद दिली आहे.

## दिशा शेट माणगावमधील पहिली महिला सर्जन डॉक्टर



माणगाव : प्रतिनिधी

माणगावचे माजी नगरसेवक तथा प्रसिद्ध उद्योजक हेमंत विष्णूदास शेट यांची कन्या डॉ. दिशा ही नुकतीच एमबीबीएस, एमएस (जनरल सर्जरी) उत्तीर्ण झाली आहे. डॉ. दिशा शेट हिने माणगाव नगरीतून तसेच गुजराती समाजातून पहिली महिला सर्जन डॉक्टर होण्याचा मान पटकाविला आहे.

दिशा ही लहानपणापासूनच बुद्धीने अत्यंत तल्लख मुलगी म्हणून संपूर्ण माणगाव नगरीत परिचित आहे. तिचे नर्सरी ते दहावीपर्यंतचे शिक्षण माणगावमधील एस. एस. निकम इंग्लिश स्कूल येथे झाले. तिचे पुढील महाविद्यालयीन शिक्षण अकरावी व बारावी फर्ग्युसन कॉलेज पुणे येथे झाले. शालेय शिक्षण घेताना तिने शिष्यवृत्ती संपादन केली आहे.

दिशा शेट हिने एमबीबीएस भारती विद्यापीठ पुणे येथून, तर एमएस (जनरल सर्जरी) कृष्णा मेडिकल जि. सातारा येथून केले. डॉ. दिशा शेट हिने सर्जन डॉक्टर पदवी संपादन केल्याने अनेकांनी तिच्या माणगाव येथील निवासस्थानी येऊन तिचे कौतुक करीत अभिनंदन केले. तर अनेकांनी तिचे दूरध्वनीवरून अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## माझी माती, माझा देश अभियानाला पेणमध्ये प्रतिसाद

**पेण : प्रतिनिधी**

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार माझी माती, माझा देश या अभियान अंतर्गत आपल्या मातीविषयी जनजागृती, प्रेम व साक्षरता निर्माण व्हावी या उद्देशाने मूठभर माती संग्रहित करण्याची संकल्पना करण्यात आली होती. या अभियानास प्रतिसाद लाभला.

पेण नगरपरिषदेचे मुख्याधिकारी जीवन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सकाळी ८.३० वाजता रॅलीला प्रारंभ झाला. या रॅलीत कार्यालयीन प्रशासन अधिकारी किरण शहा, आरोग्य निरीक्षक अंकिता इसळ, आरोग्य अधिकारी शिवाजी चव्हाण, प्रशांत ढवळे, आबासाहेब मनाल, रमेश देशमुख, रेश्मा करबेले, भरत निंबरे, महेश वडके व सहाय्यक अधिकारी, कर्मचारीवर्गाची टीम सहभागी झाली होती. शहरातील २० ठिकाणी फिरून ही माती जमा करण्यात आली. नागरिकांनीही मोठ्या उत्साहात यात सहभागी होऊन प्रतिसाद दिला.



(छाया : इजाज मनियार)

इंग्रजांचे आक्रमण आणि पेशवाईच्या अस्तानंतर पेण ही क्रांतिकारी सत्याग्रहींचीभूमी विनायकराव कोल्हटकरांपासून अनेक ज्ञात-अज्ञातांनी मातृभूमीसाठी सर्वस्व पणाला लावून पवित्र केली. या भूमीच्या अंगावरील पवित्र माती अमृतकलशात शेकडो हातांनी टाकून संकलित केली.

मातीला नमन आणि विरांना वंदन ही संकल्पनेने अमृतमहोत्सवी वर्षाची सांगता करणे ही राष्ट्रभावनेचे प्रतिक आहे. सरकारने शहिदांचे स्मरण करताना ज्या पायवाटेवरुन देश स्वतंत्र होण्यासाठी धावपळ सुरू होती त्यांच्या पदस्पर्शाने ती माती पावन झाली आहे. हे पवित्र मातीचे कलश वसुधा वाटिकेसाठी दिल्ली येथे जातील त्या वेळी मातीच्या कणाकणातून एकच आवाज निनादेल सारें जहाँ से अच्छा, हिंदोस्ता हमारा. या मातीतून रोपवाटिकेत उगवणारी वृक्षवल्ली या विषयांचे सदैव आठवण करून देतील.

## मध्य रेल्वेच्या झिरो स्क्रॅप मोहिमेला वेग

**रोहे : प्रतिनिधी**

झिरो स्क्रॅप मिशनला प्राधान्य देत जुन्या लोको, डिझेल सरप्लस लोको, नॉन-ऑपरेशनल रेल्वे लाईन्स आणि वृद्ध किंवा अपघातग्रस्त लोको-कोच यासह विविध प्रकारच्या भंगारांची ओळख आणि विल्हेवाट लावण्यासाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. या दृढनिश्चयी प्रयत्नाचे प्रभावी परिणाम मिळाले आहेत.

मध्य रेल्वेने १३२.४७ कोटींची भंगार विक्री साध्य केली आहे. चालू आर्थिक वर्षात १ एप्रिल ते १५ ऑगस्ट या कालावधीत रेल्वे बोर्डाच्या ऑगस्ट २०२३ पर्यंतच्या समानुपातिक उद्दिष्टाच्या तुलनेत २०.४१ टक्केची लक्षणीय वाढ नोंदवली आहे.

याच्या विक्रीतून ५६६९ मॅट्रिक टन रेल्वे/पी-वे, ०९ लोकोमोटिव्ह,१३३ कोच,५३ वॅगन (भुसावळ विभागातील ०६ किमी जामनेर-पाचोरा विभागातील नॅरोगेज लाइनचा समावेश आहे.)

यामध्ये मुंबई विभागाने २४.३६ कोटी रुपयांची भंगार विक्री गाठली, भुसावळ मंडळाने १७.९९ कोटी रुपयांची विक्री केली, सोलापूर परिमंडळाने ८.०९ कोटींची विक्री गाठली,नागपूर विभागाने ९.६६ कोटींची विक्री गाठली, पुणे मंडळाने १४.३३ कोटींची विक्री गाठली, माटुंगा डेपोने २३.५६ कोटींची विक्री गाठली, इलेक्ट्रिक लोको शेड डेपो, भुसावळ १३.५० कोटींची विक्रीत या विभाग आणि डेपोंनी झिरो स्क्रॅप मिशनमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.



झिरो स्क्रॅप मिशनच्या कक्षेत सर्व विभाग आणि डेपोंना भंगारमुक्त दर्जा प्राप्त करण्यासोबतच २०२३-२४ या वर्षासाठी रेल्वे बोर्डाचे ३०० कोटींचे उद्दिष्ट पार करण्याच्या वचनबद्धतेवर मध्य रेल्वे अथकपणे काम करीत आहे.

# पहिल्या टी-२०मध्ये भारत विजयी

## डकवर्थ लुईस नियमानुसार आयर्लंडचा पराभव

**डब्लिन : वृत्तसंस्था**

आयर्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेतील पहिला सामना भारताने डकवर्थ लुईस पद्धतीने दोन धावांनी जिंकला. भारताने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतल्यानंतर फलंदाजी करताना आयर्लंडने सात विकेट गमावत १३९ धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात टीम इंडियाने ६.५ षटकांत दोन गडी गमावून ४७ धावा केल्या. यानंतर पावसामुळे खेळ होऊ शकला नाही आणि भारताने डकवर्थ लुईस पद्धतीने दोन धावांनी विजय मिळवला.



आयर्लंडकडून बॅरी मॅकार्थीने शानदार फलंदाजी केली. त्याने नाबाद ५१ धावा केल्या. कर्टिस कॅम्फरने ३९ धावांचे योगदान दिले. या दोघांशिवाय केवळ पॉल स्टर्लिंग आणि मार्क ॲडायर यांना दुहेरी आकडा पार करता आला. भारताकडून प्रसिद्ध कृष्णा, जसप्रीत बुमराह आणि रवी बिश्नोई यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. त्याचवेळी अर्शदीपला एक विकेट मिळाली

भारताकडून यशस्वी जैस्वालने २३ चेंडूंत २४ धावा केल्या. त्याने एक षटकार आणि तीन चौकार मारले. तिलक वर्मा खाते उघडू शकला नाही. संजू एक आणि ऋतुराज गायकवाड १९ धावा काढून नाबाद राहिला. आयर्लंडकडून क्रेग यंगने सलग दोन चेंडूंत विकेट घेतल्या. प्रथम यशस्वीने मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात आपली विकेट गमावली. कर्णधार स्टर्लिंगने त्याचा झेल टिपला. त्यानंतर तिलकला खातेही उघडता आले नाही आणि पुढच्याच चेंडूवर तो बाद झाला. यष्टीरक्षक टकरने त्याचा झेल टिपला. मालिकेतील दुसरा सामना रविवारी (दि. २०) खेळला जाणार आहे.

### बुमराहचे विक्रमी पुनरागमन

भारतीय कर्णधार जसप्रीत बुमराहने ३२७ दिवसांनंतर पुनरागमन करत पहिल्याच षटकात ॲण्ड्र्यू बालबर्नी आणि लॉरन टकर यांना बाद करून आयर्लंडला बॅकफूटवर आणले. कर्णधार म्हणून पहिलीच ट्वेन्टी-२० जिंकणारा बुमराह हा आठवा भारतीय ठरला. यापूर्वी वीरेंद्र सेहवाग, महेंद्रसिंह धोनी, सुरेश रैना, अजिंक्य रहाणे, रोहित शर्मा, शिखर धवन, हार्दिक पांड्या, लोकेश राहुल यांनी हा पराक्रम केला आहे, पण कर्णधार म्हणून पहिल्याच सामन्यात मॅन ऑफ दी मॅच किताब जिंकणारा बुमराह पहिलाच भारतीय ठरला. त्यामुळे त्याचे हे पुनरागमन यशस्वी तसेच विक्रमीही ठरले आहे.

# तिरंदाजी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिलांना सुवर्णपदक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

अलीकडेच पार पडलेल्या जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या महिला शिलेदारांनी ऐतिहासिक कामगिरी केली. हाच विजयरथ कायम ठेवत आता भारताच्या महिला खेळाडूंनी तिरंदाजी स्पर्धेत पुन्हा एकदा सुवर्णपदक पटकावले आहे. पॅरिसमध्ये तिरंदाजी विश्वचषक स्टेज ४ कम्पाऊंड महिला सांघिक स्पर्धेत भारताने सुवर्णपदक जिंकले. ज्योती, अदिती आणि परनीत यांनी अंतिम फेरीत डब्ल्यूआर १ मेक्सिकोचा २३४-२३३ असा पराभव करून विजयावर शिक्कामोर्तब केले.



या महिलांनी काही आठवड्यांपूर्वी त्याच मेक्सिकन संघाला हरवून जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत सुवर्णपदक जिंकले होते. ज्योती सुरेखा वेन्नम, अदिती स्वामी आणि परनीत कौर यांनी जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत भारताला प्रथमच सुवर्णपदक जिंकून दिले. त्यांनी महिला कम्पाऊंड सांघिक गटाच्या अंतिम सामन्यात मेक्सिकोवर २३५-२२९ असा विजय मिळवला होता.

सुवर्णपदकाला गवसणी घालणारी अदिती स्वामी ही सातारा जिल्ह्यातील आहे. पहिले जागतिक तिरंदाजी अजिंक्यपद स्पर्धेत सांघिक सुवर्ण आणि नंतर वैयक्तिक सुवर्ण जिंकून तिने ऐतिहासिक कामगिरी केली. अशातच आता अदितीने तिच्या सहकारी खेळाडूंसोबत तिरंदाजी विश्वचषक स्टेज ४ कम्पाऊंडमध्ये सुवर्णपदकाला गवसणी घातली. लक्षणीय बाब म्हणजे जागतिक तिरंदाजी स्पर्धेच्या अंतिम फेरीत मेक्सिकोच्या ॲंड्रिया बेसेरा हिला १४९-१४७ने पराभूत करून कंपाऊंड तिरंदाजीमध्ये अदितीने विश्वविजेतेपद मिळवले होते. १७ वर्षांची अदिती भारताची पहिली विश्वविजेती ठरली आहे.

# रायगड जिल्हास्तरीय बेंचप्रेस स्पर्धेला प्रतिसाद

## अक्षय शनमुगम स्ट्राँग मॅन, अमृता भगत स्ट्राँग वूमन

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिशन संलग्न पॉवर लिफ्टिंग स्पोर्ट्स असोसिएशन ऑफ रायगडच्या वतीने पेण येथील सार्वजनिक विद्यामंदिर आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये जिल्हास्तरीय क्लासिक बेंचप्रेस स्पर्धेचे आयोजन नुकतेच करण्यात आले होते. या स्पर्धेत सिनिअर गटात पुरुषांमध्ये अक्षय शनमुगम (आयर्न मेट जिम, खोपोली) स्ट्राँग मॅन आणि महिलांमध्ये अमृता भगत (पॉवर हाऊस, खोपोली) स्ट्राँग वूमन ठरली, तर सांघिक विजेतेपद आयर्नमेट जिम, खोपोली आणि



उपविजेतेपद संसारे फिटनेस, पेण यांनी पटकाविला.

स्पर्धेचे उद्घाटन सामाजिक कार्यकर्ते, वृक्षमित्र व योगगुरू डॉ. अशोक भोईर यांच्या हस्ते आणि आंतरराष्ट्रीय पंच, शिवछत्रपती पुरस्कार विजेते आणि महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनचे सेक्रेटरी संजय सरदेसाई व कॉलेजचे मुख्याध्यापक एस. एच. नाईक यांच्या उपस्थितीत झाले. या वेळी मार्गदर्शन करताना देसाई यांनी, प्रत्येक स्पर्धेत यश मिळते असे नाही, पण आपण जिद्द सोडता कामा नये. कधी ना कधी यश आपल्या मिळतेच. आज अनेक खेळाडूंनी आपल्या खेळातून आपली कारकीर्द घडविली आहे. आपल्या खेळातून आपले जीवनमान उंचवावे असे सांगून स्पर्धेत सहभाग घेणाऱ्या स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

या स्पर्धेत जिल्ह्यातील जवळजवळ ७०हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला. सब ज्युनिअर मुलांमध्ये जय पाटील (संसारे फिटनेस), ज्युनिअर मुलांमध्ये तन्मय पाटील यांनी किताब प्राप्त केले. पनवेल येथील शिवगिरी सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै. दिलीप उर्फ दादा खोत यांच्या स्मरणार्थ विजेत्यांना पदक व चषक देण्यात आले.

या स्पर्धासाठी कार्याध्यक्ष यशवंत मोकल यांच्या मार्गदर्शनाखाली सचिन भालेराव, अरुण पाटकर, माधव पंडित, राहुल गजरमल, संदीप पाटकर यांनी परिश्रम घेतले. सहाय्यक म्हणून सुभाष टेंबे, स्थानिक राष्ट्रीय खेळाडू राजेश अनगत यांनी मोलाचे सहकार्य केले. पंच म्हणून गोपीनाथ पवार, अंकुश सावंत सुरेश धुळप, उत्तम धुरी, विशाल मुळये, राजेश शिर्के यांनी काम पाहिले.

# चौलच्या रामेश्वर पुष्करणीत रंगली जलतरण स्पर्धा

## प्रेम पाटील प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

स्वातंत्र दिनाचे औचित्याने चौलमधील रामेश्वर पुष्करणीत सालाबादप्रमाणे यंदाही पोहण्याच्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत अंतिम फेरीत प्रेम पाटील याने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकाविला. अमर पाटील व्दितीय, तर दिनांशू कुथे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले.

(छाया : महेश प्रे)



या स्पर्धेत जिल्ह्यातील स्पर्धकांनी सहभाग नोंदविला. गट क्रमांक १मध्ये प्रेम पाटील प्रथम, दिनांशू कुथे व्दितीय, मनीष कोकाटे तृतीय; गट २मध्ये अमर पाटील, साहिल कुथे, ऋतिक शिर्के हे अनुक्रमे पहिले तीन; गट ३मध्ये मानस वैभव म्हात्रे, रूद्र किशोर मानकर, साई मंगेश पिळणकर पहिले तीन; गट ४मध्ये रूद्र नवले, नक्ष निलेश घरत, निरव वर्तक पहिले तीन; गट ५ (मुली)मध्ये सई संजय पिळणकर, आदिश्री हेमंत जाधव, मानसी नरेश नाईक पहिल्या तीन; गट ६मध्ये सई संजय पाटील, आरोही नितीन राऊत, नेहा दिनेश कोंडे पहिल्या तीन; गट ७मध्ये दिनांशु कुथे, कृतक लांडगे, सर्वज्ञ सुहास शिंदे पहिले तीन; गट ८मध्ये सत्यम पारखी, आदेश गोळे, अर्थ नंदन पहिले तीन; गट ९मध्ये संकेत म्हात्रे, साहिल कुथे, पियुष पाटील पहिले तीन; गट १०मध्ये दिनांशु कुथे व प्रेम पाटील, रोहित कुथे व सार्थक इंद्रे, अमर पाटील व वेदांत शिंदे पहिल्या तीन जोड्या, गट ११मध्ये जितेंद्र जाधव, हेमंत जाधव, वैभव नाईक; गट क्रमांक १२मध्ये रोहित कुथे, सार्थक इंद्रे, सुजय भोय यांनी पहिले तीन क्रमांक पटकाविले.

विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते चषक प्रदान करण्यात आले. स्पर्धा यशस्वीतेसाठी रामेश्वर मित्र मंडळाच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.



# विराट कोहलीचा जबरा फॅन

## वर्ल्डकपपूर्वी १० लाखांची डायमंड बॅट गिफ्ट देणार

**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा सुपरस्टार विराट कोहली याचा खूप मोठा चाहता वर्ग आहे. १५ वर्षांच्या आंतरराष्ट्रीय कारकीर्दित विराटने अनेक मोठमोठे विक्रम मोडले. आता वन डे वर्ल्डकप स्पर्धेसाठी विराट सज्ज होतोय. अशातच गुजरातमधील सुरतस्थित एका व्यावसायिकाने विराटचे अनोख्या पद्धतीने कौतुक करण्याचा निर्णय घेतला आहे. हा व्यावसायिक विराटला १.०४ कॅरेट हिऱ्याने जडलेली बॅट भेट देण्याच्या तयारीत आहे.

विराटला भेट म्हणून मिळणारी डायमंड बॅट तयार होण्यासाठी एक महिना लागला. सुरतमधील हा हिरे व्यावसायिक क्रिकेटचा मोठा चाहता आहे आणि गेल्या काही वर्षांपासून तो विराटच्या खेळीच्या प्रेमात पडलेला आहे. या बॅटची किंमत सुमारे १० लाख रुपये आहे.

विराट कोहलीने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १५ वर्ष पूर्ण केली. त्याने या कालावधीत भारताकडून १११ कसोटींत ४९.२९च्या सरासरीने ८६७६ धावा केल्या आहेत. त्यात २९ शतके व तितक्याच अर्धशतकांचा समावेश असून नाबाद २५४ ही त्याची सर्वोत्तम वैयक्तिक खेळी आहे. २७५ वनडे सामन्यांत त्याच्या नावावर ४६ शतकं व ६५ अर्धशतके आहेत. त्याने ५७.३२च्या सरासरीने १२८९८ धावा केल्या आहेत. ११५ ट्वेंटी-२० सामन्यांत ५२.७३च्या सरासरीने त्याच्या नावावर ४००८ धावा असून त्यात एक शतक व ३७ अर्धशतकांचा समावेश आहे.

डायमंड टेक्नॉलॉजी तज्ज्ञ आणि सुरतमधील लेक्सस सॉफ्टमॅक कंपनीचे संचालक उत्पल मिस्त्री यांनी डायमंड बॅट बनवण्याच्या प्रक्रियेवर देखरेख केली होती. देशातील एका अव्वल क्रिकेटपटूला हिऱ्याची बॅट भेट द्यायची होती. प्रयोगशाळेतील हिरा आणि नैसर्गिक हिरा यातील फरक सांगणे यंत्राशिवाय खूप अवघड आहे. डोळ्यांनी बघून तुम्ही सांगू शकणार नाही, असे उत्पल मिस्त्री यांनी सांगितले.

# पालीतील अनुज सरनाईकला सुवर्णपदक

## राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत दमदार कामगिरी

**पाली : प्रतिनिधी**

इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशन (आयपीएसएफ)च्या मान्यतेने महाराष्ट्र पिंच्याक सिलॅट असोसिएशनने (एमपीएसए) ११वी राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट वरिष्ठ वयोगटातील महिला व पुरुष स्पर्धा नाशिक येथे आयोजित केली होती. पालीतील अनुज दत्तगुरू सरनाईकने या स्पर्धेत 'सुवर्ण' कामगिरी केली.

११ व्या राष्ट्रीय पिंच्याक सिलॅट स्पर्धेत महाराष्ट्र संघाचा डंका वाजला आहे.त्यामुळे राज्य व देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. ही स्पर्धा पंचवटीतील मीनाताई ठाकरे विभागीय क्रीडा संकुलात झाली. या स्पर्धेत २८ राज्ये व आठ केंद्रशासित प्रदेश तसेच ऑल इंडिया पोलीस, सीआयएसएफ, आयटीबीपी, एसएसबी संघ असे एकूण ९०० खेळाडू सहभागी झाले होते.



या राष्ट्रीय स्पर्धेचे बक्षीस समारंभ नाशिकचे खासदार हेमंत आप्पा गोडसे, म.वि.प्र. समाज संस्था सरचिटणीस नितीन ठाकरे, इंडियन पिंच्याक सिलॅट फेडरेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष किशोर येवले, खजिनदार इरफान भुट्टो, महाराष्ट्र असोसिएशनच्या संचालिका तृप्ती बनसोडे, नगरसेविका प्रतिभा पवार यांच्या हस्ते झाला.

या स्पर्धेत महाराष्ट्र संघाने सात सुवर्ण, दोन रौप्य, नऊ कांस्यपदकांसह सांघिक विजेतेपद पटकावले. मणिपूर संघाने पाच सुवर्ण, एक रौप्य, चार कांस्यपदकांसह द्वितीय आणि जम्मू आणि काश्मीर संघाने तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि तीन कांस्यपदकांसह तिसरे स्थान प्राप्त केले.

या खेळाचा समावेश गोव्यात होणाऱ्या ३७व्या राष्ट्रकुल स्पर्धेत १४ मे २०२३ रोजी भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनने केला आहे. ११व्या राष्ट्रीय स्पर्धेतून विजयी झालेल्या प्रत्येक वजनगटातील १६ खेळाडूंची निवड राष्ट्रकुल स्पर्धेसाठी झाली आहे. या खेळामध्ये मागील ११ वर्ष महाराष्ट्र संघ अव्वल स्थानी आहे.

# बांगलादेशी खेळाडूने केला निखाऱ्यावरून चालण्याचा सराव

**ढाका : वृत्तसंस्था**

आशिया चषकाचा थरार ३० ऑगस्टपासून रंगणार आहे. या स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर सर्वच संघ कामाला लागले आहेत. काही संघांचे संघदेखील जाहीर झाले आहेत. अशातच एका बांगलादेशी खेळाडूचा अनोखा व्हिडीओ व्हायरल होत आहे, ज्यात तो निखाऱ्यावरून चालताना दिसत आहे.



बांगलादेश क्रिकेट बोर्डाने आगामी आशिया चषकासाठी १७ सदस्यीय संघाची घोषणा केली आहे. या संघात २३ वर्षीय मोहम्मद नईमलाही स्थान मिळाले आहे. नईमचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर खूप व्हायरल होत आहे. यामध्ये तो ट्रेनरच्या मदतीने धाडसी सराव करताना चक्क निखाऱ्यावरून चालत आहेत. मीडिया रिपोर्ट्सनुसार बांगलादेशमध्ये हे प्रशिक्षण सामान्य आहे, ज्यामुळे खेळाडूला शांत आणि आरामशीर राहण्यास मदत होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com